की/६५



( ... सायटी, पुणे )
११३३, ...शिव पेठ, पुणे ३०

# लक्षण-गीते

गोविंदराव टेंबे

123 उ

की/६५

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणें
(डे. व्ह. ट्रा. सोसायटी, पुणें)
११३३, सदाशिव पेठ, पुणें ३०

श्री. गोविंदराव टेंबे
रचित

# लक्षण - गीते

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणें
( डे. व्ह. ट्रा. सोसायटी, पुणें )
११३३, सदाशिव पेठ, पुणें ३०

मूल्य रु. ३·००

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : एप्रिल १९६९

मूल्य : तीन रुपये फक्त

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
‘ तपश्चर्या ’
३८१ क, शनिवार पेठ, पुणे २

मुद्रक :
द. वा. आंबेकर
आर्यभूषण मुद्रणालय
९१५/१ शिवाजीनगर
पुणे ४

२ मा. ५७८६.

अर्पण

तीर्थरूप सौ. मातोश्रींच्या चरणीं—

# निवेदन

आमचे वडील कै. ती. दादा यांनी सुमारे इ. स. १९३० ते ३३ च्या सुमारास ही लक्षण-गीते रचिली. तीनचार गीते रचून तयार झाली म्हणजे निकटच्या परिवारात त्यांचे वाचन, गायन व चर्चा चाले. त्या वेळी पद्मभूषण आप्पासाहेब फडके, श्री. बापूराव शाळिग्राम, कै. नवरेशास्त्री ( कवी नागेश ) कै. केशवराव पाटील यांची नित्याची बैठक आमच्याकडे असे. ती. दादांचा हा मित्रपरिवार त्यांच्या काव्यगुणावर नेहमीच खूष असे. केवळ बौद्धिक करमणूक म्हणून ही गीते रचिली असल्यामुळे, त्यांच्या प्रसिद्धीकरणाची कधीच खटपट केली गेली नाही; ती. दादांच्या मृत्यूनंतरही गेली १२–१३ वर्षे तशीच पडून होती.

या गीतांची मोहिनी पद्मभूषण श्री. आप्पासाहेब फडके यांच्या मनावर अद्यापिही राहिल्यामुळे, त्यांच्याच प्रोत्साहनाने ही लक्षणगीते आज प्रकाशात येत आहेत. प्रकाशकही त्यांनीच गाठून दिले; अर्थात या प्रकाशनाचे श्रेय सर्वस्वी त्यांचेच आहे हे निर्विवाद आहे. वडिलांच्या पश्चातही श्री. आप्पासाहेबांचा लोभ आम्हा टेंबे कुटुंबियांवर कायम आहे याचे हे प्रतीक आहे.

लक्षण-गीते म्हणजे काय हे संगीताची उपासना करणाऱ्यांना निराळे सांगण्याची जरूरी नाही. ज्या रागात गीत असेल त्या रागाची शास्त्रीय माहिती त्या गीतात असते. आणि त्यालाच लक्षण-गीत म्हणतात. अशी लक्षणगीते पुष्कळांनी रचिली आहेत. रागांची लक्षणे गीतद्वारा विद्यार्थ्यांच्या लक्षात राहण्यास सोपी जावी एवढाच त्यात हेतू असतो. त्यामुळे काव्य-गुणांची त्यांत अपेक्षाही नसते. काव्यगुणांचा तीत अभाव असल्यामुळे फक्त संगीतवर्गात ती परीक्षेपुरती गायली जातात व परीक्षा पास झाल्याबरोबर ती विसरूनही जातात.

गीतांमध्ये रागाची नुसती लक्षणेच न सांगता त्यांत काव्यगुण असावा, ही गीते बैठकीत म्हणावयाची झाल्यास म्हणता यावीत, असा, ही लक्षण-गीते रचताना ती. दादांचा हेतू असावा. वाचकांना असे दिसून येईल की, गीत जर सरळ वाचत गेले तर त्यातून एक अर्थ निघेल, व गीताची व काही ठिकाणी शब्दाची फोड करून पाहिले तर रागांची लक्षणे समजून येतील. उदाहरणार्थ : हमीर रागातील पहिली ओळ "गमनीं राधा तीव्रता वरी" यात ही राधा ( नावाची स्त्री ) किती वेगाने चालली आहे !" असा सरळ अर्थ निघतो.

आणि 'ग' 'म' 'नीं' 'रा' 'धा' तीव्रता वरी म्हणजे गंधार, मध्यम, निषाद, ऋषभ व धैवत हे स्वर तीव्र असतात. अशी ही द्व्यर्थी गीते आहेत. अशा तऱ्हेची लक्षण-गीते रचणे हे अर्थात बुद्धीच्या कसरतीचे व प्रतिभेचे काम आहे. काही गीतांत रागाची सर्वच्या सर्व लक्षणे असतीलच असे नाही, पण प्रमुख लक्षणे खासच आहेत. लक्षणे ही उघड उघड दिसणारी नसल्याने गीताची फोड करून दाखविणे अपरिहार्य झाले आहे.

ती. दादांनी आपल्या "कल्पना संगीत" पुस्तकात नोटेशनच्या दोन पद्धती दिल्या आहेत. त्यांपैकी स्वराचे दोनच प्रकार कल्पून, ऱ्हस्व स्वर म्हणजे कोमल स्वर आणि दीर्घ स्वर म्हणजे तीव्र स्वर, या पद्धतीने नोटेशन दिले आहे. नोटेशनसंबंधीचा खुलासा स्वतंत्र ठिकाणी दिला आहे.

"व्हीनस प्रकाशन"चे चालक श्री. पाध्येसाहेब यांनी केवळ श्री. आप्पासाहेब फडके यांच्या शिफारशीवरून प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करण्याचे स्वीकारले. ती. दादांचे एक पुस्तक आपण प्रसिद्ध करावे ही तीव्र इच्छाच त्याच्यामागे आहे यात शंका नाही. आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. अ. गं. मंगरूळकर यांचा टेंबे कुटुंबियाशी गेला २८ वर्षांचा ऋणानुबंध आहे. गीतांचा भावार्थ करून देण्याच्या बाबतीत प्रकृती बरी नसतानाही त्यांनी जे सहाय्य दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

गीतांच्या चाली मी पुष्कळ वेळा ऐकल्या होत्या पण त्यांचे व्यवस्थित नोटेशन करण्याच्या बाबतीत कोल्हापुरातील प्रसिद्ध गायक व माझे मित्र श्री. आनंदराव लिमये व श्री. सुधाकर डिग्रजकर यांनी मला फार मदत केली. दोघांचेही मी मनापासून आभार मानतो.

पुस्तक प्रकाशनामध्ये सर्वांत किचकट, पण तितकेच जोखमीचे काम म्हणजे प्रुफे तपासणे. या कामाची कधीच सवय नसल्यामुळे माझे मित्र 'व्यवहारी ज्ञानकोशकार' श्री. ग. रं. भिडे यांनी याबाबत आपुलकीने मार्गदर्शन करून माझा हा मार्ग सुलभ केला याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. कळावे.

दि. १९ मार्च १९६९
१३५५, C लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर.

माधव गोविंद टेंबे.

# नोटेशनबद्दल सूचना

हिंदुस्थानी संगीतातील चिजा अगर गीते नोटेशनवरून पूर्णतया बसविता येत नाहीत असे मोठमोठ्या संगीतज्ञांनी म्हटले आहे, व पुष्कळांचा अनुभवही तोच आहे. तरी पण आतापर्यंत मोठमोठ्या कलावंतांनी आपल्याजवळील जुन्या व नव्या स्व-रचित चिजा नोटेशनसहित प्रसिद्ध केल्या आहेत. कुठल्याही चिजेचे सौंदर्य, त्यातील शब्दांचा उच्चार, दोन स्वरांमधील लागणाऱ्या श्रुती, अक्षराला लागणारे कणस्वर, गायकाची म्हणण्याची पद्धत यांवर अवलंबून आहे. ( शिवाय चिजेच्या रागाची मांडणी, बढत, विस्तार हा भाग अलगच आहे. ) या गोष्टी गुरुमुखातून लवकर साध्य होतात. पण नोटेशनवरून गीत बसविणाऱ्याला वरील गोष्टीसाठी स्वतःच्या मगदुरावरच अवलंबून राहावे लागते. एकच राग अगर चीज निरनिराळ्या गवयांकडून निरनिराळ्या पद्धतीने गाइली जाते. प्रत्येकाची रंगत निरनिराळी असते. ( आणि यामुळेच आपल्या हिंदुस्थानी संगीत पद्धतीमध्ये व्यक्तिवैशिष्ट्याला भरपूर वाव मिळतो. ) गीतांचे नोटेशन देण्याचे एकच कारण की, गीतातील शब्दांना कुठले स्वर आहेत एवढेच गीत बसविणाऱ्यास कळावे. गीतांच्या दोन अक्षरांमधील जागा, त्याचे कणस्वर, शब्दाचा उच्चार स्वतःच्या कल्पकतेने ज्याचा त्याने बसवावा. मार्गदर्शनासाठी काही सूचना कराव्याशा वाटतात त्या अशा—

१. शब्दोच्चार जरी स्पष्ट असले पाहिजेत तरी त्यामध्ये हळुवारपणा असावा. अगदी कोरून केलेल्या शब्दोच्चारामुळे, गीताला रूक्षपणाची झाक येते.

२. दोन स्वरांमधील अंतर मधल्या श्रुतींनी जोडून घ्यावे. प्रत्येक अक्षराला मागील स्वराची जोड असावी, म्हणजे त्याला एक प्रकारची गोलाई येते. चालीलाही एक प्रकारचा नितळ गोलपणा येतो.

३. गीत बसविताना तालाच्या एका सबंध आवर्तनाचे स्वर बसवून घ्यावेत. एकेका शब्दाचे स्वर बसवू नयेत. एकामागून एक अशी सर्व आवर्तने बसली म्हणजे नंतर स्वरांच्या ठिकाणी शब्द, आकार, ईकार इत्यादी घालावे.

४. कणस्वर लावताना, विवादी स्वर न लागण्याची दक्षता घ्यावी.

प्रस्तुत पुस्तकातील नोटेशनसाठी खालील पद्धती अवलंबिली आहे—

१. स्वरांचे दोनच भेद मानले आहेत. एक तीव्र व दुसरा कोमल. शुद्ध मध्यमाला कोमल मध्यम समजावे. दीर्घ स्वर तीव्र समजावेत, व ऱ्हस्व स्वर कोमल समजावेत. जसे— तीव्र स्वर : सा, री, गा, मा, प, धा, नी.

कोमल स्वर : रि, ग, म, ध, नि.

' प ' हा अचल स्वर म्हणून तसाच लिहिला आहे.

२. मंद्र सप्तकातील स्वरांच्या खाली टिंब दिले आहे. जसे— ऩि, ध़, प़.

३. तार सप्तकातील स्वरांच्या वर टिंब दिले आहे. जसे— रीं, गां, मं.

४. ज्या स्वरांच्या डोक्यावर ⌒ अशी खूण आहे ते स्वर मींडने घ्यावेत.

५. गीताच्या तालाप्रमाणे खंडानुसार वरच्या बाजूस मात्रा दिल्या आहेत.

समेच्या मात्रेला + अशी खूण आहे, व कालाच्या मात्रेस ० अशी खूण आहे. बहुशः एका मात्रेला एक स्वर आहे. काही ठिकाणी एका मात्रेत दोन अगर जास्त स्वर आहेत, तेथे त्या स्वरसमूहाखाली अर्धचंद्र काढला आहे. जसे— गम, गामप.

६. ज्या अक्षराच्या पुढे ऽ अशी खूण आहे तेथे त्या अक्षराचा आकार अगर ईकार पुन्हा घेण्याचा आहे.

७. ज्या अक्षरापुढे – अशी खूण आहे त्या अक्षराचा स्वर तितकी मात्रा लांबविण्याचा आहे.

८. सर्व गीते मध्यलयीतील आहेत.

गीत बसविणाऱ्यास सोपे जावे अशा तऱ्हेने त्यांचा अनुक्रम ठेवला आहे. प्रथम, सर्व तीव्र स्वरांचे राग आहेत, नंतर ज्यांत फक्त एकच कोमल स्वर आहे असे राग, नंतर दोन कोमल स्वर असलेले राग, नंतर तीन-चार-पाच. असे कोमल स्वर वाढवीत नेलेले आहेत. गीत बसविणाऱ्यास तितकेच सोईचे होईल.

# रागांचा अनुक्रम

| रागाचे नाव | कोमल स्वर | रागाचे नाव | कोमल स्वर |
|---|---|---|---|
| १ भूप | — | १७ पटदीप | ग, म |
| २ शुद्धकल्याण | — | १८ केदार | म, नि |
| ३ हिंदोल | — | १९ खंबावती | म, नि |
| ४ शंकरा | — | २० मुलतानी | रि, ग, ध |
| ५ पुरिया | रि | २१ तोडी | रि, ग, ध |
| ६ सोहनी | रि | २२ पूर्वी | रि, म, ध |
| ७ मारवा | रि | २३ भैरव | रि, म, ध |
| ८ यमनकल्याण | म | २४ वसंत | रि, म, ध |
| ९ दुर्गा | म | २५ परज | रि, म, ध |
| १० विहाग | म | २६ भीमपलास | ग, म, नि |
| ११ हमीर | म | २७ बागेश्री | ग, म, नि |
| १२ कामोद | म | २८ जैजैवंती | ग, म, नि |
| १३ सारंग | नि | २९ बहार | ग, म, नि |
| १४ ललत | रि, म | ३० जीवनपुरी | ग, म, ध, नि |
| १५ पुरियाधनाश्री | रि, ध | ३१ मालकंस | ग, म, ध, नि |
| १६ गौरी | रि, ध | ३२ भैरवी | रि, ग, म, ध, नि |

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | २१ | दिशा | निशा |
| ४ | ७ | सानी | सानी़ |
| ७ | ५ | मध | माधा |
| ७ | ७ | स | सा |
| ८ | २२ | विरहिता | विहरता |
| १८ | २ | पा | प |
| १८ | ५ | स | सा |
| १८ | ५ | धा | ध़ा |
| २९ | १९ | १० वी मात्रा | रीं |
| ५४ | १३ | ना | नी |
| ५६ | ७ | त̄रि | तरि |
| ५७ | १ | ग | गा |
| ६३ | १९ | नी | ऩी |
| ६७ | १५ | री | रीं |
| ६७ | १५ | री | रीं |
| ६७ | १९ | नी | नि |
| ६७ | १९ | सा | सां |
| ६९ | ५ | ध | ग |
| ६९ | ९ | राग | गं |
| ६९ | १७ | सा | सां |
| ७१ | ५ | नि | नि़ |

द.क. ५७९५

# अनुक्रमणिका


| राग | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १. भूप | ... | १ |
| २. शुद्ध कल्याण | ... | ३ |
| ३. हिन्दोल | ... | ६ |
| ४. शंकरा | ... | ८ |
| ५. पुरिया | ... | ११ |
| ६. सोहनी | ... | १३ |
| ७. मारवा | ... | १५ |
| ८. यमन-कल्याण | ... | १७ |
| ९. दुर्गा | ... | १९ |
| १०. बिहाग | ... | २१ |
| ११. हमीर | ... | २३ |
| १२. कामोद | ... | २६ |
| १३. सारंग | ... | २८ |
| १४. ललत | ... | ३१ |
| १५. पुरिया धनाश्री | ... | ३३ |
| १६. गौरी | ... | ३५ |
| १७. पटदीप | ... | ३७ |
| १८. केदार | ... | ३९ |
| १९. खंबावती | ... | ४२ |
| २०. मुलतानी | ... | ४५ |
| २१. तोडी | ... | ४७ |
| २२. पूर्वी | ... | ४९ |
| २३. भैरव | ... | ५१ |
| २४. वसंत | ... | ५३ |
| २५. परज | ... | ५६ |
| २६. भीमपलास | ... | ५८ |
| २७. बागेश्री | ... | ६० |
| २८. जैजैवन्ती | ... | ६२ |
| २९. बहार | ... | ६४ |
| ३०. जीवनपुरी | ... | ६६ |
| ३१. मालकंस | ... | ६८ |
| ३२. भैरवी | ... | ७० |

राग : भूप | ताल : त्रिताल

मनीं न शिवे ही कदा राग भूपा
हरी सकल सुजनांच्या तापा ॥ ध्रु० ॥
ओडव कुल वृत्ती गंभीरा
सखा मानि निज जो गांधारा
निशारंभिं शुद्ध भाव धरिं गा ॥ १ ॥

**भावार्थ**— अहो, या राजाला क्रोध कसा तो माहितच नाही. सज्जनांची पीडा निवारण करण्यास हा सदैव तत्पर आहे. याचे कुल ओडव. ( पंचस्वरात्मक ), वृत्ती धीरगंभीर, गांधार याचा सुहृद, आणि संध्या-समयी हा सदा शुद्ध भाव धारण करतो.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| 'म' 'नीं' न शिवे | — या रागाला मध्यम व निषाद हे स्वर वर्ज्य आहेत. |
| राग भूपा | — भूप रागाला. |
| ओडव कुल | — या रागाला पाचच स्वर लागतात, म्हणून ओडव जाती. |
| वृत्ती गंभीरा | — या रागाची प्रकृती गंभीर आहे. |
| सखा मानि जो गांधारा | — गंधार स्वर वादी आहे. |
| निशारंभिं | — रात्रीच्या पहिल्या प्रहरीं याचा गायन समय आहे. |
| शुद्ध भाव 'ध' 'रिं' 'गा' | — धैवत, ऋषभ व गंधार हे स्वर तीव्र आहेत. |

आरोह— सा री गा प धा सां

अवरोह— सां धा प गा री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | | म | निं | न | शि | वे | – | ही | क | दा | राऽ | ऽ | ग |
| | | | | सा | सा | री | धा़ | सा | – | गा | री | गा | गापा | धा | प |
| भू | ऽ | पा | – | ह | री | – | स | क | ल | सु | ज | नांऽ | ऽ | च्या | ऽ |
| गा | री | सा | – | गा | गा | – | री | गा | प | धा | धा | पधा | सां | धा | प |
| ता | ऽ | पा | – | | | | | | | | | | | | |
| गा | री | सा | – | | | | | | | | | | | | |
| | | | | ओ | – | ड | व | कु | ल | व्र | – | सी | ऽ | गं | – |
| | | | | सां | – | धा | प | गा | री | गा | प | धा | सां | सां | – |
| भी | ऽ | रा | – | स | खा | – | मा | – | नि | नि | ज | जो | ऽ | गां | ऽ |
| सां | रीं | सां | – | सां | गां | – | रीं | – | रीं | सां | सां | धा | सां | धा | सां |
| धा | ऽ | रा | – | नि | शा | ऽ | रं | ऽ | भिं | शु | – | द्ध | भाऽ | ऽ | व |
| धा | धा | प | – | प | धा | सां | धा | धा | प | गा | – | प | गाप | धा | प |
| ध | रिं | गा | – | | | | | | | | | | | | |
| गा | री | सा | – | | | | | | | | | | | | |

राग : शुद्धकल्याण | ताल : झपताल

जो भूपानुसारी मंत्रिवर
परि पाहि सुहृदसम
जनताहितासि, शुद्ध कल्याणकारी ॥ ध्रु० ॥

आरोहिं रोधि मन, अवरोहिं करि यमन
नच निशा दिन गणुन, पीडा निवारी ॥ १ ॥

**भावार्थ**— नेहमी राजाच्या तंत्राने वागणारा, प्रजेचे सुख एखाद्या नित्य कल्याणकारी मित्राप्रमाणे सांभाळणारा, प्रजेवर जबरदस्ती करताना मनाला आवर घालणारा, प्रजेशी मिळते घेताना स्वतःचा दर्जा न विसरणारा, रात्रंदिवस कसलीही क्षिती न बाळगता (प्रजेच्या) दुःखाचे निवारण करणाऱ्या एखाद्या अमात्यश्रेष्ठाप्रमाणेच हा शुद्धकल्याण राग आहे.

**राग-लक्षणे**--

भूपानुसारी — हा राग 'भूप' रागासारखा भासतो.

'प' 'रि' पाहि सुहृदसम -- याचा पंचम संवादी असून ऋषभ हा स्वर वादी आहे.

शुद्धकल्याण -- रागाचे नाव.

आरोहिं रोधि 'म' 'न' -- आरोहात मध्यम व निषाद हे स्वर वर्ज्य आहेत.

अवरोहिं करि यमन -- अवरोहात यमन रागाप्रमाणे सातही स्वर लागतात.

नच दिशा दिन गणुन -- दिवस नाही व रात्रही नाही, म्हणजे संध्याकाळ हा गानसमय आहे. (काहींच्या मते रात्रीचा पहिला प्रहर हा गानसमय आहे.)

आरोह— सा री गा प धा सां

अवरोह— सां नी धा प मा गा प री सा

| १ + | २ | ३ – | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ – | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जोऽ | ऽऽ | ऽ | भूऽ | ऽ | पा | – | नु |
| | | सारी | गापा | धा | पमा | गा | गा | – | प |
| सा | – | री | – | – | मंऽ | ऽ | त्रि | व | र |
| री | – | सा | – | – | सानी | धा | धा | प | प |
| प | रि | पा | ऽऽ | हि | सु | हृ | द | स | म |
| री | गा | प | मागा | गा | प | री | री | सा | सा |
| ज | न | ता | ऽ | हि | ताऽ | ऽ | – | सिऽ | ऽ |
| सा | री | गा | प | प | गाप | धा | – | पमा | गा |
| शु | – | द्ध | क | – | ल्याऽऽऽ | ऽ | ण | काऽऽ | ऽ |
| गा | – | प | धा | – | धाधागाप | सां | धा | पमागा | प |
| री | ऽ ॥ | | | | | | | | |
| री | सा | | | | | | | | |
| आ | – | रो | – | हिं | रो | – | धी | म | न |
| गा | – | प | – | प | सां | – | सां | सां | सां |

| १ + | २ | ३ — | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ — | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | व | रो | ऽ | हिं | क | रि | य | म | न |
| सां | सां | रीं | गां | पं | रीं | रीं | सां | सां | सां |
| न | चऽ | नि | शा | ऽ | दिऽ | न | ग | णु | न |
| सां | नीधा | धा | प | गा | पमा | ग | प | री | री |
| पी | ऽ | डा | ऽ | नि | वाऽऽऽ | ऽ | ऽऽ | ऽ | ऽऽ |
| सा | री | गा | प | धा | धाधापधा | सां | नीधा | प | गाप |
| री | ऽ | | | | | | | | |
| री | सा | | | | | | | | |

राग : हिंदोल ताल : रूपक

पंचसुर हिंदोलिं झुलती,
त्यागिती परि, मृदुल भावा
न दाविती ॥ ध्रु० ॥

निशा चढता खुले वृत्ति
वादिं संवादीं धग धगति
धुंद आंदोलनीं रमति ॥ १ ॥

**भावार्थ**— कोमल भावनांचा ज्यांच्या ठिकाणी लवलेशही दिसून येत नाही, असे हे देवांचे पंचायतन हिंदोळ्यावर झोके घेत आहे. जसजशी रात्र वाढू लागली तसतशी त्यांची वृत्ती खुली होऊन, त्यांच्या वादविवादाला रंग चढू लागला, व जोरजोरात झोके घेण्यात ते दंग होऊन जातात.

**राग-लक्षणे**—

पंचसुर हिंदोलिं — 'हिंदोल' रागाला पाच स्वर लागतात.

त्यागिती 'प' 'रि' — पंचक व ऋषभ हे स्वर वर्ज्य आहेत.

मृदुल भावा न दाविती — कोमल स्वर एकही नाही; सर्व स्वर तीव्र आहेत.

निशा चढतां खुले वृत्ति — उत्तर रात्रीच्या वेळी गायन समय आहे.

वादिं संवादीं 'ध' 'ग' — धैवत हा स्वर वादी व गंधार स्वर संवादी आहे.

धुंद आंदोलनीं रमति — या रागाला आंदोलने व गमक यांनी विशेष शोभा येते.
(काही तज्ज्ञांच्या मते हा राग सकाळीही गातात.)

आरोह— सा गा मा धा नी धा सां

अवरोह— सां नी धा मा गा सा

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | – | | – | | ० | | | – | | – | |
| पं | – | च | सु | र | हिं | ऽ | दो | – | लिं | झु | ल | ती | ऽऽ |
| सां | – | धा | मा | गा | मा | धा | सां | – | सां | सां | धा | नी | मध |
| त्या | – | गि | ती | ऽ | प | रि | मृ | दु | ल | भा | ऽ | वा | – |
| सा | – | मा | गा | – | स | सा | सा | गा | गा | मा | धा | धा | – |
| न | दा | ऽ | वि | ऽ | ती | ऽऽ।। | | | | | | | |
| धा | नी | धा | नी | धा | नी | माधा | | | | | | | |
| नि | शा | – | च | ढ | ता | ऽ | खु | ले | – | वृ | – | त्ति | – |
| मा | धा | – | सां | सां | सां | – | सां | सां | – | सां | – | सां | – |
| चा | – | दिं | सं | – | वा | – | दीं | ध | ग | ध | ग | ती | – |
| सां | – | गां | गां | – | सां | – | सां | नी | धा | नी | मा | धा | – |
| धुं | – | द | आं | ऽ | दो | – | ल | नीं | – | र | म | ति | ऽ |
| सां | – | गां | मां | गां | गां | – | सां | सां | – | नी | धा | मा | धा |

◆ ◆

राग : शंकरा                                                    ताल : झपताल

**रुचत नगनिवास शंकरा मारविनाशा**
**आरोहणीं करित विलासा ॥ ध्रु० ॥**

**धरि गानिं तीव्रता, नागा रमविता**
**मध्य निशिं विहरता, नमा त्या महेशा ॥ १ ॥**

**भावार्थ**— मदनाचा नाश करणाऱ्या शंकराला पर्वतनिवास आवडावा यात नवल नाही. फार काय, पर्वतावर आरोहणानेच त्याच्या विलासाला सुरुवात होते. अंगावरच्या नागांना खेळविता खेळविता मध्यरात्रीपर्यंत त्याचे रौद्र गायन चाललेले असते. त्या महामहेश्वराला वंदन करा.

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| रुचत 'न' 'ग' निवास | — | या रागात निषाद व गंधार या स्वरांवर भर असतो. गंधार वादी व निषाद संवादी. |
| शंकरा | — | रागाचे नाव |
| 'मा' 'र' विनाशा आरोहणीं | — | आरोहात मध्यम व ऋषभ वर्ज्य आहेत. |
| 'ध' 'रि' 'गा' 'निं' तीव्रता | — | या रागात धैवत, ऋषभ, गंधार व निषाद हे स्वर तीव्र आहेत. |
| 'ना' 'गा' रमविता | — | 'निषाद' स्वर संवादी व गंधार स्वर वादी आहे. |
| मध्य निशिं | — | मध्यरात्रीच्या सुमारास गायन समय आहे. |
| विरहिता न 'मा' | — | अवरोहातही मध्यम स्वर लागत नाही. |

आरोह— सा गा प नी धा सां

अवरोह— सां नी प गा प गा री सा

| १ + | २ | ३ — | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ — | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु | च | त | न | ग | नि |
| | | | | सां | नी | सां | नी | धा | नी |
| वा | – | – | स | शं | ऽ | क | रा | – | ऽ |
| प | – | – | गा | नी | धा | सां | नी | – | प |
| मा | – | र | वि | ना | ऽ | शा | – | – | – |
| गा | – | गा | प | गा | री | सा | – | – | – |
| आ | – | रो | ऽ | ह | णीं | क | रि | त | वि |
| सा | – | गा | प | गा | प | गा | प | नी | नी |
| लाऽ | ऽऽ | साऽ | ऽ ‖ | | | | | | |
| पनी | सांगां | सांनी | सां | | | | | | |
| ध | रि | गा | – | निं | ती | ऽ | त्र | ता | – |
| गा | प | सां | – | सां | सां | नी | रीं | सां | – |
| ना | – | गा | – | – | र | म | वि | ता | – |
| नी | – | प | – | – | नी | धा | सां | नी | – |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | — | | | ० | | — | | |
| म | — | ध्य | नि | शि | — | वि | ह | र | ता |
| सां | — | गां | गां | पं | — | गां | गां | रीं | सां |
| न | मा | — | त्या | -- | म | हेऽऽ | ऽ | ऽ | शा |
| सां | नी | — | प | — | प | पनीसां | गं | रीं | सां |
| ऽ | ऽ | ऽ | ऽ ॥ | | | | | | |
| नी | सां | नी | सां | | | | | | |

◆ ◆

**राग : पुरिया** **ताल : त्रिताल**

**नवल पुरिं या मूक कोकिला**
**पंचमा नसे थारा ॥ ध्रु० ॥**

**नृप तेवि मंत्री गानीं रमति रातीं**
**कोमला रीति परि, मंद्र रवें करिती विहारा ॥ १ ॥**

**भावार्थ--** काय आश्चर्य आहे या गावात! वसंतऋतूत इथे कोकिळा गात नाहीत, त्यामुळे पंचम स्वर कुठे ऐकूच येत नाही. राजे व अमात्य हेसुद्धा रात्रीच्या वेळी, मंद्र व हलक्या आवाजात चाललेल्या गायनात रमलेले दिसतात.

**राग-लक्षणे--**

| | |
|---|---|
| पुरिया | — रागाचे नाव |
| पंचमा नसे थारा | — या रागाला पंचम स्वर वर्ज्य आहे. |
| नृप तेवि मंत्री 'गा' 'नीं' रमति | — गंधार स्वर वादी व निषाद संवादी स्वर आहे. |
| रातीं | — गायन समय रात्रीचा आहे. |
| कोमला 'री' | — ऋषभ स्वर कोमल आहे. (बाकी स्वर तीव्र) |
| मंद्र रवें करिती विहारा | — हा राग विशेषतः मंद्र सप्तकात गातात. |

आरोह— ऩी रि गा मा धा नी सां

अवरोह-- सां नी धा मा गा रि सा

| | | | |
|---|---|---|---|
| ९ १० ११ १२ | १३ १४ १५ १६ | १ २ ३ ४ | ५ ६ ७ ८ |
| ० | – | + | – |
| न | व ल पु रिं | या – मू – | क को ऽ क्रि |
| मा | गा रि ऩी रि | सा – ऩी – | ध़ा ऩी रि नि़ |
| ला ऽ पं – | च मा – न | से – – – | थाऽ ऽ ऽऽ ऽ |
| म़ा ध़ा ऩी – | रि गा – मा | गा – – – | गामा धा गामा गा |
| रा ऽ ऽ न | व ल – ॥ | | |
| ऩी रि सा | | | |
| नृ | प ते – वि | मं ऽ त्री – | गा ऽ नीं – |
| मा | धा सां – सां | नी रिं सां – | सां सां सां – |
| र म ती – | रा ऽ तीं – | को ऽ म ला | री ऽ ति – |
| नी रिं नी – | धा मा गा – | ऩी – रि गा | ऩी रि सा – |
| प रि – मं | ऽ द्र र वें | क रि ती वि | हाऽ ऽ ऽऽ ऽ |
| ऩीं ध़ा – म़ा | ध़ा ऩी रि गा | गा सा गा गा | गामा धा गामा गा |
| रा ऽ ऽ | ॥१॥ | | |
| ऩी रि सा | | | |

राग : सोहनी

ताल : त्रिताल

सोहनी मन मोहिनी तीव्र गमनीं
धरि मृदु तार स्वनिं ॥ ध्रु० ॥
मूकता वरी पंचम स्वनीं
नृप, मंत्री डुलति धग सोसुनी
अपर निशिं खुलुनि रमवि अनुरागिणी ॥ १ ॥

**भावार्थ**—ही मनमोहक सोहनी नामक स्त्री किती जलद गतीने चालली आहे! ही उंच स्वरात गात असतानाही, गाण्याचा परिणाम कोमलच होतो. पंचम स्वर वर्ज्य असलेल्या गाण्यात, ही प्रेमला, उत्तर रात्री इतकी रंगत आणते की राजे-अमात्य इत्यादी सर्व त्रास सोसून या रंगतीत एकजीव होऊन जातात.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| सोहनी | — रागाचे नाव |
| तीव्र 'ग' 'म' 'नीं' 'ध' | — गंधार, मध्यम, निषाद व धैवत हे स्वर तीव्र आहेत. |
| 'रि' मृदु | — रिषभ मात्र कोमल आहे. |
| तार स्वनिं | — तार सप्तकात गायन प्रचार. |
| मूकता वरी पंचम स्वनिं | — पंचम स्वर वर्ज्य आहे. |
| डुलति 'ध' 'ग' | — धैवत स्वर वादी, व गंधार स्वर संवादी आहे. |
| अपर निशिं | — गायन समय रात्रीचा आहे. |

आरोह— सा गा मा धा नी सां रिं सां

अवरोह— सां रिं सां नी धा मा गा रि सा

| ९ १० ११ १२ | १३ १४ १५ १६ | १ २ ३ ४ | ५ ६ ७ ८ |
|---|---|---|---|
| ० | — | + | — |
| | – सो ऽ ह | नी – – म | न मोऽ ऽ हि |
| | – मा धा नी | सां – – धा | नी धानी सां नी |
| नी ऽ ऽ – | ती – व्र ग | म नीं ध रि | मृ दु ता – |
| धा मा गा – | गा – गा मा | गा रि सा रिं | सां रिं सां – |
| र – स्व नीं | – ॥ | | |
| सां – नी धा | – | | |
| मू – क ता | ऽ व री – | पं – च म | स्व नीं ऽ – |
| मा – धा नी | सां रीं सां – | सां – सां सां | सां नी धा – |
| नृ प मं ऽ | त्री डु ल ति | ध ग सोऽ ऽ | सु नी – – |
| सां सां सां – | सां नी धा धा | सां सां धानी सां | धा नी – – |
| अ प र नि | शिं खु लु नि | र म वि अ | नु राऽ ऽ गि |
| सां गां रिं मां | गां रिं सां सां | मा धा नी सां | रिं धानी सां नी |
| णी ऽ ऽ – | – | | |
| धा मा गा – | – | | |

राग : मारवा ताल : त्रिताल

हा मारवारी मृदुमोह घालि जरि
मनिं धग तीव्र धरी ॥ ध्रु० ॥
वादि संवादी सदा धरी
सायंकालीं सुजनसंग वरि
कोकिल-स्वर मानि वैरी ॥ १ ॥

**भावार्थ**—हा मारवाडी कठोर हृदयाचा जरी आहे, तरी लोक त्याच्याकडे आकर्षिले जातात. हा दुसऱ्याशी सदोदित वादविवाद घालीत असतो; मात्र सायंकाळी सज्जन लोकांत वावरतो. पण हा इतका अरसिक मनाचा की, कोकिळेचा मधुर स्वरसुद्धा याला आवडत नाही.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| मारवा | — रागाचे नाव |
| 'री' मृदु | -- ऋषभ हा स्वर कोमल आहे. |
| 'म' 'निं' 'ध' 'ग' तीव्र | — मध्यम, निषाद, धैवत, गंधार हे स्वर तीव्र आहेत. |
| वादिसंवादी सदा 'ध' 'री' | — या रागात धैवत हा वादी, व ऋषभ हा स्वर संवादी आहे. |
| सायंकालीं | — गायन समय संध्याकाळचा आहे. |
| 'कोकिलस्वर मानी वैरी' | — कोकिळस्वर म्हणजे पंचम हा स्वर वर्ज्य आहे. |

आरोह— ऩी री गा मा प धा नी सां

अवरोह— सां नी धा पा मा, गा म गा री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | − | | | | + | | | | − | | | |
| से | − | वी | ऽ | ऽ | स | क | ल | ही | − | − | सु | रु | चि | रा | − |
| सा | − | सा | ऩी | सा | ध़ा | ऩी | री | सा | − | − | सा | ऩी | ध़ा | प़ | − |
| ती | ऽ | त्र | सु | रा | ऽ | जो | − | य | म | न | त | या | ऽ | सी | − |
| ऩी | ध़ा | ऩी | री | ऩी | री | सा | − | ऩी | ऩी | री | री | ऩी | री | री | − |
| झु | ल | त | झु | ल | त | नि | शा | ऽ | रं | − | भीं | ज | ना | ऽ | मो |
| ऩी | री | गा | म | गा | री | मा | मा | गा | प | − | मा | री | गा | री | ध़ा |
| ऽ | ऽऽ | ऽऽ | ही | − ॥ | | | | | | | | | | | |
| ऩी | रीगा | माप | री | − | | | | | | | | | | | |
| गा | ऽ | नीं | वा | − | दिं | सं | ऽ | वा | ऽ | दी | म | धु | र | ता | − |
| गा | प | गा | प | − | प | मा | गा | धा | मा | नी | धा | मा | धा | प | − |
| मृ | दु | म | ऽ | ध्य | म | क | ऽ | ल्या | ऽ | ण | प | थ | दाऽ | ऽऽऽ | वि ॥ |
| गा | म | गा | री | नी | धा | प | मा | री | गा | री | सा | नीं | नीरी | गामा | परी |

राग : दुर्गा ताल : त्रिताल

शिव साहेना भूषणा नागा
मृदु मध्य दुर्गा धरि तीव्र रागा ॥ ध्रु० ॥

पंचस्वर शरें वेधि शंकरा
पंचम स्वनीं रमवि कोकिला
संधि लाभे शश लांछना ॥ १ ॥

**भावार्थ**-- ( योगिराज शिवावर केवढा कठीण प्रसंग आला आहे हा ! ) मदनाने आपल्या पांच स्वररूपी बाणांनी त्याचा वेध घेतला आहे, ( वसंतऋतू बहरात आला असून ) कोकिळा आपल्या पंचम स्वराने त्याला मोहवीत आहे, त्यातच चंद्रानेही ( आपल्या शीतल किरणांच्या स्रावाने ) त्याला व्याकूळ करण्याची संधी साधून घेतली आहे, गळ्यातील नागाचा थंडपणा त्याला (अर्थात शिवाला ) आता अगदी असह्य झाला आहे. ( पण हा योगिराज शिव, यत्किंचितही विचलित होत नाही, हे पाहून ) कोमलकटी दुर्गा ( पार्वती ) अगदी क्रोधाविष्ट झाली आहे.

**राग-लक्षणे**--

साहेना भूषणा 'ना' 'गा' -- या रागात निषाद व गंधार हे स्वर वर्ज्य आहेत.

मृदु मध्य -- मध्यम स्वर कोमल आहे.

दुर्गा -- रागाचे नाव

'ध' 'रि' तीव्र -- धैवत व ऋषभ हे स्वर तीव्र आहेत.

पंचस्वर -- या रागाला पाचच स्वर लागतात म्हणून औडव जाती.

पंचम स्वनीं रमवि — पंचम हा स्वर वादी आहे.

संधि लाभे शश लांछना — रात्रीच्या वेळी हा राग गातात.

आरोह— सा री म प धा सां
अवरोह— सां धा प म री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | शि | व | सा | ऽ | हे | ना | – | – | भू | – | ष | णा | ऽ |
| | | | धा | धा | म | म | री | प | – | – | प | – | म | प | धा |
| ना | ऽ | गा | मृ | दु | म | – | ध्य | दु | – | र्गा | ध | रि | तीऽ | ऽ | त्र |
| म | री | सा | धा़ | सा | री | – | म | म | – | धा | धा | सां | धासां | रीं | सां |
| रा | ऽ | गा | ॥ | | | | | | | | | | | | |
| धा | प | म | | | | | | | | | | | | | |
| | | | | पं | – | च | स्व | र | श | रें | ऽ | वे | – | धि | शं |
| | | | | म | – | म | धा | धा | धा | प | धा | सां | – | सां | सां |
| ऽ | क | रा | – | पं | – | च | म | स्व | नीं | – | – | र | म | वि | को |
| धा | रीं | सां | – | धा | – | धा | धा | सां | रीं | – | – | धा | सां | रीं | सां |
| ऽ | कि | ला | – | सं | – | धि | ला | ऽ | भे | – | श | श | लांऽ | ऽ | छ |
| धा | धा | प | – | रीं | – | धा | सां | सां | प | – | धा | सां | धासां | रीं | सां |
| ना | ऽ | ऽ | ॥ | | | | | | | | | | | | |
| धा | प | म | | | | | | | | | | | | | |

राग : बिहाग ताल : त्रिताल

निशिं विहार करि हा विहंग,
आरोहीं अरि अधम दोन तरि
वक्रगति करुनि उतरे अभंग ।। ध्रु० ।।
कुल ओडव-संपूर्ण जयाचें
वादि संवादी ग नी साचे
तीव्र मध्यम धुनिं स्वर नाचे
संनिध पंचम उडवित रंग ।। १ ।।

**भावार्थ—** हा पक्षिराज ( विहंग = बिहाग ) रात्रीच्या वेळी गगनविहार करीत आहे. वर जाताच दोन दुष्ट शत्रू ( वर्ज्य असे ऋषभ व धैवत ) त्याची वाट पाहात आहेत. हे पाहून त्यासरशी मोठ्या वळणा-वाकणाच्या गतीने तो खाली उतरत आहे. त्याचे कुल ओडव–संपूर्ण, गंधार–निषाद हे वादी–संवादी, तीव्र मध्यम कधी कधी प्रगट होतो, पण जवळचाच पंचम रंगत करून जातो.

**राग-लक्षणे—**

| | |
|---|---|
| विहंग | — बिहाग हे नांव ' विहंग ' याचा अपभ्रंश आहे असे म्हणतात. |
| निशिं विहार | — गानसमय रात्रीचा आहे. |
| आरोहीं अ 'रि' अ 'ध' | — आरोहात ऋषभ व धैवत वर्ज्य आहेत. |
| 'म' दोन तरि वक्रगति | — तीव्र व कोमल दोन्ही मध्यम लागतात. पण ते वक्र असतात. एकामागून एक असे क्रमाने लागत नाहीत. |
| उतरे अभंग | — अवरोहात या रागास सातही स्वर लागतात. |
| कुल ओडव-संपूर्ण | — आरोहात पाच व अवरोहात सात स्वर, म्हणून ओडव-संपूर्ण जाती. |
| वादी संवादी 'ग' 'नी' | — वादी स्वर गंधार व संवादी निषाद आहे. |
| तीव्र मध्यम धुनिं स्वर नाचे | — तीव्र मध्यम मधून मधून लागतो. |

आरोह— ऩी सा गा म प नी सां

अवरोह— सां नी धा प मा गा म गा री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | − | | | | + | | | | − | | | |
| नि | शिं | वि | हा | ऽ | र | क | रिऽ | हा | − | वि | हं | ऽ | ऽ | ग | − |
| सा | म | गा | गा | प | प | धा | माप | गा | − | म | गा | री | सा | सा | − |
| आ | ऽ | रो | ऽ | हीं | ऽ | अ | रि | अ | ध | म | दो | ऽ | न | त | रि |
| ऩी | सा | म | गा | प | प | मा | प | नी | धा | प | मा | प | धा | म | गा |
| व | क्र | ग | ति | क | रु | नी | ऽ | उ | त | रे | ऽ | अ | भं | − | ग॥ |
| गा | म | प | नी | सां | नी | धा | प | नी | धा | मा | प | म | गा | री | सा |
| कु | ल | ओ | ऽ | ड | व | सं | ऽ | पू | − | र्ण | ज | याऽ | ऽ | चे | − |
| गा | म | गा | म | प | प | नी | धा | सां | − | सां | सां | नीसां | रीं | सां | − |
| वा | − | दी | − | सं | − | वा | − | दीऽ | - | ग | नी | साऽ | ऽ | चे | − |
| नी | − | सां | − | नी | − | नी | − | माप | − | प | नी | पनां | सां | नी | − |
| ती | − | व्र | म | ऽ | ध्य | म | धु | निं | ऽ | स्व | र | ना | ऽ | चे | − |
| सां | − | नी | धा | प | मा | प | धा | मा | प | मा | प | गा | म | गा | − |
| सं | − | नि | ध | पं | ऽ | च | म | उ | ड | वि | त | रं | ऽ | ग | − |
| सा | − | सां | सां | नी | रें | सां | सां | गा | म | प | म | गा | री | सा | − |

◆ ◆

**राग : हमीर** **ताल : त्रिताल**

**गमनीं राधा तीव्रता वरी**
**नाग वक्रगति मृदुल मध्यमा**
**जाई हरिच्या शोधा ॥ ध्रु० ॥**

**शाम हमीर रुसोनि बसला**
**बहुधा कुंजवनीं कीं लपला**
**प्रहर एक परि निशिंचा झाला**
**काय म्हणेल आतां यशोदा ! ॥ १ ॥**

**भावार्थ**-- ही नाजुक कमरेची राधा श्रीकृष्णाचा शोध घेण्यासाठी किती घाईघाईने आणि वळणावळणाच्या रस्त्याने निघाली आहे ! तो शामसुंदर 'हमीर' तर रुसून रागावून निघून गेला—बहुतेक तो कुंजवनातच लपून बसला असेल— आता संध्याकाळ संपून गेली, आणि अजून कृष्ण घरीं आला नाही तर यशोदा काय बरे म्हणेल आपल्याला !

**राग-लक्षणे—**

| | |
|---|---|
| 'ग' 'म' 'नीं' 'रा' 'धा' तीव्रता वरी | — या रागाला गंधार, मध्यम, निषाद, ऋषभ व धैवत हे स्वर तीव्र लागतात. |
| 'ना' 'ग' वक्रगति | — निषाद व गंधार हे स्वर वक्र लागतात. |
| मृदुल मध्यमा | — मध्यम हा स्वर कोमलही लागतो ( दोन्ही मध्यम लागतात. ) |
| हमीर | — रागाचे नाव. |
| बहु 'धा' | — धैवत स्वर वादी आहे. |
| प्रहर एक परि निशिंचा झाला | — रात्री एक प्रहर झाल्यावर या रागाचा गायनसमय आहे. |

आरोह— सा गा म धा – नी सां

अवरोह— सां धा नी धा प मा प गा म री सा

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | ग | म | नीं | रा | ऽ | धा | – | – | ती | ऽ | त्र | ताऽ | ऽ |
| | | | धा | मा | प | गा | म | धा | – | – | नी | धा | नी | सांनी | सां |
| व | री | ऽ | – | ना | – | ग | व | ऽ | क्र | ग | ति | मृ | दु | ल | म |
| धा | मा | प | – | गा | – | री | गा | म | धा | मा | प | गा | म | री | सा |
| ऽ | ध्य | मा | – | जा | – | ई | ऽ | ह | री | च्या | ऽ | शोऽ | ऽऽ | धा | ऽ |
| ऩी | री | सा | – | सा | – | म | गा | प | धा | मा | प | धानी | सांरीं | सां | नी |
| ऽ | ऽ | ऽ | | | | | | | | | | | | | |
| धा | मा | प | | | | | | | | | | | | | |
| शा | – | म | ह | मी | – | र | रु | सोऽ | ऽऽ | नी | ऽ | ब | स | ला | ऽ |
| प | – | सां | सां | सां | – | सां | नी | धानी | सांरीं | नी | सां | धा | धा | मा | प |
| ब | हु | धा | ऽ | कुं | – | ज | ब | नींऽ | ऽऽ | कीं | ऽ | ल | प | ला | ऽ |
| गां | मं | रीं | सां | सां | – | सां | नी | धानी | सांरीं | नी | सां | धा | धा | मा | प |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ ० | १० | ११ | १२ | १३ — | १४ | १५ | १६ | १ + | २ | ३ | ४ | ५ — | ६ | ७ | ८ |
| प्र | ह | र | ए | ऽ | क | प | रि | नि | शिं | चाऽ | ऽ | झा | – | ला | ऽ |
| गा | म | री | गा | म | धा | मा | प | गा | गा | गाम | प | री | – | ऩी | सा |
| का | ऽ | य | म्ह | णे | – | ल | आ | तां | ऽ | – | य | शोऽ | ऽऽ | दा | ऽ |
| ऩी | सा | म | गा | प | – | प | धा | मा | प | – | प | धानी | सांरीं | सां | नी |
| ऽ | ऽ | ऽ | ॥ | | | | | | | | | | | | |
| धा | मा | प | | | | | | | | | | | | | |

◆ ◆

राग : कामोद ताल : एकताल

**आमोद देई सकलां, कामोद यामिनी**
**नवयौवनिं, प्रबल सुहृद पंचम,**
**ऋषभ जयाला ॥ ध्रु० ॥**
**पूर्ण जाती, गानीं लघु, वक्रगती**
**तीव्रताहि ये मृदु मध्याला ॥ १ ॥**

**भावार्थ**-- रात्र अगदी भरात आली म्हणजे ' कामोद ' ( हा राग ) सर्वांना आनंद देतो. पंचम आणि ऋषभ ( या स्वरांना ) तो आपले जिवलग मित्र करितो. याची जाती संपूर्ण, गंधार अल्प प्रमाणात व निषाद वक्रगतीचा, कोमल मध्यमाच्याऐवजी तीव्र मध्यमही कधी कधी चमकतो.

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| कामोद | — | रागाचे नाव. |
| यामिनी नवयौवनिं | — | रात्र भरात आली असता, म्हणजे रात्रीचा दुसरा प्रहर हा गानसमय. |
| प्रबल सुहृद पंचम, ऋषभ जयाला | — | पंचम स्वर वादी व ऋषभ स्वर संवादी आहे. |
| पूर्ण जाती | — | याची जाती संपूर्ण आहे. सातही स्वर लागतात. |
| 'गा' 'नीं' लघु, वक्रगती | — | गंधार अल्पप्रमाणात व निषाद वक्र लागतो. |
| तीव्रताहि ये मृदु मध्याला | — | कोमलऐवजी मधून मधून तीव्र मध्यमही लावतात. |

आरोह— सा री प, मा प धा सां
अवरोह-- सां नी धा प, गा म प गा म री सा

| १<br>+ | २ | ३<br>० | ४ | ५ | ६ | ७<br>० | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आ | ऽ | मो | ऽ | द | दे | ऽ | ई |
| | | | | धा | प | गा | म | री | सा | नी़ | सा |
| स | क | ला | – | का | ऽ | मो | ऽ | द | या | ऽ | मि |
| म | री | प | – | मा | प | गा | म | प | प | धा | मा |
| नी | – | न | व | यौ | ऽ | व | निं | प्र | ब | ल | सु |
| प | – | म | री | सा | री | नी़ | सा | धा़ | धा़ | धा़ | सा |
| हृ | द | पं | – | च | म | ऋ | ष | भ | ज | या | ऽ |
| सा | सा | सा | – | री | री | गा | म | प | प | गा | म |
| ला | ऽ | ऽ | ऽ | ॥ | | | | | | | |
| री | ऽ | नी़ | सा | | | | | | | | |
| पू | – | र्ण | जा | – | ती | गाऽ | ऽऽ | नीं | ऽ | ल | घु |
| प | – | प | सां | – | सां | धानी | सांरीं | नी | सां | धा | प |
| व | – | क्र | ग | ती | ऽ | ती | – | व्र | ता | ऽ | ही |
| रीं | – | सां | धा | मा | प | गा | – | म | धा | मा | प |
| ये | ऽ | मृ | दु | म | ऽ | ध्या | ऽ | ला | ऽ | ॥१॥ | |
| मा | प | धा | प | मा | प | गा | म | री | सा | | |

◆ ◆

राग : सारंग ताल : झपताल

येइ चंडांशु जइं व्योम मध्यावरी
रिघत सारंग कुल, धग निवारण करी ॥ ध्रु० ॥
असुनि कोमल मनीं, प्रबल परिरंजनीं
ओढवी मन मोहि, जेवि मृग मृगवारी ॥ १ ॥
तीव्र मन करुनिया, धग हि जो आदरी
तप्त कांचन समा शुद्ध रूपा वरी ॥ २ ॥
गमनीं मृदुता वरी सारंग ' वृंदावनी '
' मधुमाद ', ' बडहंस ' विविध शोभा वरी ॥ ३ ॥

**भावार्थ**— उग्र किरणांचा सूर्य गगनमध्यावर आला की हरिणांचे सर्व कळप उन्हाचे निवारण करण्यासाठी ( सावलीच्या शोधार्थ ) निघाले आहेत. मृगजल जसे मृगांना भुरळ घालते त्याप्रमाणे, ही कोमल मनाची हरणे लोकांना आकर्षून घेण्यात पटाईत आहेत. ( सावलीच्या अभावी हा हरिणांचा कळप ) मन घट्ट करून शेवटी उष्णताही सोसतो, ( त्यामुळे ) त्यांचे रूप तावून-सुलाखून काढलेल्या सोन्यासारखे झळझळीत दिसते. 'वृंदावनी' ( नामक ) कळपाच्या चलनामध्ये सौम्यता, असते. ' मधुमाद ' व ' बडहंस ' ( नामक ) कळप आपापल्या परींनी विविध सुंदरता धारण करितात.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| येइं चंडांशु जइं व्योम मध्यावरी | -- सूर्य मध्यावर आल्यानंतर गानसमय. |
| रिघत सारंग कुल | -- सर्व प्रकारचे सारंग राग. |
| 'ध' 'ग' निवारण करी | -- धैवत व गंधार हे स्वर वर्ज्य आहेत. |
| कोमल 'म' | -- मध्यम हा स्वर कोमल आहे. |
| 'नीं' प्रबल | — निषाद स्वर तीव्र आहे. |
| 'प' 'रि' रंजनी | -- पंचमस्वर वादी व ऋषभ संवादी आहे. |
| ओढवी | -- याची जाती ओडव- म्हणजे पाच स्वर घेणारी. |
| तीव्र 'म' 'न' करुनि | -- तीव्र मध्यम व तीव्र निषाद घेतल्यास, |
| 'ध' 'ग' हि जो आदरी | -- व धैवत व गंधार घेतल्यास, |
| शुद्ध रूपा वरी | — त्या रूपाला ' शुद्ध सारंग ' म्हणतात. |
| 'ग' 'म' 'नीं' मृदुता | — गंधार, मध्यम व निषाद हे स्वर (योग्य तऱ्हेने ) वापरले तर ' वृंदावनी ', ' मधमाद ', ' बडहंस ' ही रूपे होतात. |

आरोह— सा री म प नी सां
अवरोह— सां नि प म री सा

| १ + | २ | ३ | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ये | ऽ | इ | चं | ऽ | डां | ऽ | शु | ज | इ |
| सां | नि | प | म | प | री | म | प | नी | सां |
| व्यो | — | म | म | — | ध्या | ऽ | व | री | ऽ |
| सां | — | नि | प | — | री | म | री | ऩी | सा |
| रि | घ | त | साऽ | ऽऽ | रं | — | ग | कु | ल |
| ऩी | ऩी | सा | रीम | पम | री | — | री | सा | सा |
| ध | ग | नि | वाऽऽ | ऽ | र | ण | क | री | ऽ ॥ |
| म | म | प | पनीसां | रीं | नी | सां | रीं | नी | सां |
| अ | सु | नि | को | ऽ | म | ल | म | नीं | — |
| म | म | प | नि | प | नी | नी | सां | सां | — |
| प्र | व | ल | प | रि | रं | ऽ | ज | नीं | ऽ |
| नी | नी | सां | रीं | सां | नी | सां | सां | नि | प |
| ओ | — | ढ | वीऽ | ऽऽ | म | न | मो | ऽ | हि |
| म | — | प | नीसां | रींमं | रीं | सां | रीं | नीं | सां |
| जे | ऽ | वि | मृ | ग | मृ | ग | वाऽ | ऽऽ | री । |
| नि | म | प | म | प | म | प | पनी | सांरीं | |

| १ + | २ | ३ – | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ – | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ती | – | त्र | म | न | क | रु | नि | या | ऽ |
| प | – | प | नि | प | नी | सां | नी | सां | – |
| ध | ग | हि | जो | ऽ | आंऽ | ऽ | द | री | – |
| नी | नी | नी | सां | सां | पनी | सां | नी | सां | – |
| त | – | म | कां | – | च | न | स | मा | ऽ |
| रीं | – | मं | रीं | – | रीं | रीं | रीं | नी | सां |
| शु | ऽ | द्ध | रू | ऽ | पाऽ | ऽऽ | व | री | ऽ ॥ |
| नि | म | प | म | प | पनी | सांरीं | रीं | नी | सां |
| ग | म | नीं | मृ | दु | ताऽ | ऽऽ | व | री | – |
| री | म | प | प | प | रीम | रीम | री | सा | – |
| सा | ऽ | रं | ऽ | ग | त्रं | दा | ऽ | व | नीं |
| ऩी | सा | री | म | म | प | री | म | म | प |
| म | धु | मा | ऽ | दऽ | ब | ड | हं | ऽ | स |
| म | प | नि | सां | निप | नी | नी | नी | सां | सां |
| वि | वि | ध | शो | ऽ | भा | ऽ | व | रीऽ | ऽऽ ॥ |
| रीं | नी | सां | नि | प | री | म | प | पनी | सांरीं |

राग : ललत | ताल : रूपक
--- | ---

ललित कोमल दावि रामा
तीव्र गति ये गान धामा ॥ ध्रु० ॥
करिं उभय मध्या क्रमेनें
पंचम स्वनीं मूक गानें
उजळ होतां दिशावदनें
मध्यमीं मृदु घे विरामा ॥ १ ॥

**भावार्थ**— ही नाजुक सुंदरी, ललितपूर्ण गीत गात, किती जलदीने घराकडे येत आहे! ( तिच्या गायनात ) दोन्ही मध्यम क्रमाने येतात, पंचम वर्ज्य असतो. आणि सूर्योदय झालेला पाहून ती विश्रान्तीसाठी मध्येच थांबते आहे.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| ललित | — रागाचे नाव. |
| कोमल दावि 'रा' 'मा' | -- ऋषभ व मध्यम हे स्वर कोमल आहेत. |
| तीव्र गति ये 'गा' 'न' 'धा' 'मा' | -- गंधार, निषाद, धैवत व मध्यम हे स्वर तीव्र लागतात. ( मध्यम दोन्ही आहेत ) |
| उभय मध्या क्रमेनें | -- दोन्ही मध्यम एकामागून एक असे क्रमाने लागतात. |
| पंचम स्वनीं मूक गानें | — पंचम स्वर वर्ज्य आहे. |
| उजळ होतां दिशावदनें | -- गायनसमय प्रभातपूर्वीचा आहे. |
| मध्यमीं मृदु घे विरामा | — कोमल मध्यम हा वादी स्वर आहे. |

आरोह— ऩी रि गा म – मा म गा – मा धा सां

अवरोह— रिं नी धा – मा धा मा म गा – रि सा

| १<br>० | २ | ३ | ४<br>– | ५ | ६<br>– | ७ | १<br>० | २ | ३ | ४<br>– | ५ | ६<br>– | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ल | लि | त | को | ऽ | म | ल | दा | – | वि | रा | ऽ | मा | ऽ |
| गा | म | गा | रि | सा | ऩी | रि | म | – | म | म | मा | म | गा |
| ती | – | व्र | ग | ति | येऽ | ऽ | गा | – | न | धा | – | मा | ऽ।। |
| गा | – | गा | म | म | माम | गा | मा | – | धा | धा | – | मा | म |
| क | रि | उ | भ | य | म | – | ध्या | – | क्र | मे | ऽ | नें | – |
| मा | गा | मा | धा | सां | सां | – | सां | – | सां | नी | रिं | सां | – |
| पं | – | च | म | स्व | नीं | – | मू | ऽ | क | गा | ऽ | नें | – |
| नी | – | रिं | गां | रिं | सां | – | नी | रिं | नी | मा | धा | मा | म |
| उ | ज | ळ | हो | ऽ | ता | – | दि | शा | – | व | द | नें | ऽ |
| गा | म | गा | रि | सा | ऩी | – | गा | म | – | गा | म | मा | गा |
| म | – | ध्य | मीं | ऽ | मृ | दु | घेऽ | ऽ | वि | रा | ऽ | माऽ | ऽऽ।। |
| म | – | गा | मा | धा | धा | मा | धानी | सां | सां | नी | रिं | नीधा | माम |

राग : पूरिया धनाश्री ताल : झपताल

**पूरिया धनाश्री मृदु मधुर भाव धरि**
**तीव्र गमनीं बघुनि मार सायक मारि ॥ ध्रु० ॥**
**पंचम सुवादिनी, ऋषभ संवादिनी**
**संधिकालीं रमणी, पूर्ण अनुराग वरि ॥ १ ॥**

**भावार्थ**— ही कोमल व मधुर भावना बाळगणारी पूरिया धनाश्री ( नावाची रमणी ) तीव्र गतीने जाताना पाहून मदनाने तिच्यावर बाण सोडला. ( व तिला कामविह्वल केले. ) मधुभाषी पंचम व ऋषभ हे तिच्या सोबतीला आहेत. आणि सायंकाळी ही रमणी पूर्ण प्रेममयी बनून गेली.

**राग-लक्षणे—**

| | |
|---|---|
| पूरिया धनाश्री | — रागाचे नाव |
| मृदुमधुर भाव 'ध' 'रि' | — धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत. |
| तीव्र 'ग' 'म' 'नीं' | — गंधार, मध्यम व निषाद हे स्वर तीव्र आहेत. |
| 'मा' 'र' | — मध्यम व ऋषभ या स्वरांची विशेष संगती आहे. |
| पंचम सुवादिनी | — पंचम स्वर वादी आहे. |
| ऋषभ संवादिनी | — ऋषभ स्वर संवादी आहे. |
| संधिकालीं | — गानसमय संध्याकाळचा आहे. |
| पूर्ण अनुराग वरि | — हा राग संपूर्ण आहे. सातही स्वर लागतात. |

आरोह— ऩी रि गा मा प ध नी सां

अवरोह— सां नी ध प मा रि गा रि सा.

| १ + | २ | ३ — | ४ | ५ | ६ ० | ७ | ८ — | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पू | – | रि | या | – | ध | नाऽ | ऽ | श्री | – |
| ऩि | – | रि | गा | – | रि | गामा | प | प | – |
| मृ | दु | म | धु | र | भा | ऽ | व | ध | रि |
| प | प | ध | मा | प | मा | रि | गा | रि | सा |
| ती | – | व्र | ग | म | नीं | व | धु | नि | – |
| मा | – | ध | नी | ध | रिं | नी | ध | प | – |
| मा | – | र | सा | ऽ | य | क | माऽ | ऽ | री॥ |
| प | – | प | मा | ध | मा | गा | मागा | रि | सा |
| पं | – | च | म | सुऽ | वा | – | दि | नी | – |
| गा | – | मा | ध | साधा | सां | – | सां | सां | – |
| ऋ | ष | भ | सं | ऽ | वा | ऽ | दि | नी | – |
| नी | नी | ध | नी | ध | रिं | नी | ध | प | – |
| सं | – | धि | का | ऽ | लीं | – | र | म | णी |
| मा | – | ध | नी | सां | सां | – | गां | रिं | सां |
| पू | – | र्ण | अ | नु | रा | ऽ | ग | व | रि॥ |
| रिं | – | नी | ध | प | मा | रि | गा | रि | सा |

राग : गौरी ताल : त्रिताल

गमनीं तीव्र जरि, मृदुल भाव धरि
सायंकालीं विलसे गौरी ॥ ध्रु० ॥
पंचम स्वनीं खुलत रागिणी
स्वराञ्चलें मध्यमा लपेटुनि
सुंदर रूप निषादीं धरुनी
भुलवि मंजुला तो मदनारी ॥ १ ॥

**भावार्थ**— ही ' गौरी ' द्रुतगती खरी, पण कोमल भावात्मक आहे. संध्याकाळी हिच्या सौंदर्याची विशेष खुलावट होते. स्वररूपी वस्त्र आपल्या कमरेभोवती गुंडाळून घेऊन, एका भिल्लिणीचे रमणीय रूप धारण करून, ही रमणी मदनदाहक शिवाला भुरळ घालू पाहते आहे.

**राग-लक्षणे**--

| | | |
|---|---|---|
| 'ग' 'म' 'नीं' तीव्र | -- | गंधार, मध्यम व निषाद हे स्वर तीव्र लागतात. |
| मृदुल भाव 'ध' 'रि' | — | धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत. |
| सायंकालीं विलसे | — | गायन समय सायंकाळचा आहे. |
| गौरी | — | रागाचे नाव. |
| पंचम स्वनीं खुलत | — | पंचम स्वर वादी आहे. |
| स्वराञ्चलें मध्यमा लपेटुनि | — | मध्यमापासून उलटून. |
| सुंदर रूप 'निषादीं' धरुनी | — | निषादापर्यंत येण्यात या रागाचा विशेष आहे. |

आरोह— ऩी रि गा रि गा मा प, ध नी सां

अवरोह— सां नी ध प मा गा, मा गा रि गा, रि सा ऩी

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | | ग | म | नींऽ | ऽऽ | ती | ऽ | व्र | ज | रि | मृ | दु | ल |
| | | | | गा | रि | गामा | पमा | गा | रि | सा | रि | ऩी | सा | गा | रि |
| भाऽ | ऽ | व | ध | रि | सा | यं | — | का | ऽ | लीं | — | वि | ल | से | ऽ |
| गामा | प | प | प | प | प | प | — | मा | ध | प | — | मा | मा | गा | रि |
| गौ | ऽ | रीऽऽ | ऽऽऽ ॥ | | | | | | | | | | | | |
| गा | मा | गारिगा | रिसाऩी | | | | | | | | | | | | |
| पं | — | च | म | स्व | — | नीं | ऽ | खु | ल | त | रा | ऽ | गि | णी | — |
| प | — | मा | गा | मा | — | ध | नी | सां | सां | सां | सां | नी | रिं | सां | — |
| स्व | रां | — | च | लें | ऽ | म | — | ध्य | मा | ऽ | ल | पे | ऽ | ढु | नि |
| नी | नी | — | ध | नी | ध | नी | — | ध | नी | ध | रिं | नी | ध | प | प |
| सुं | ऽ | द | र | रू | ऽ | प | नि | षाऽ | — | दींऽ | ऽऽ | ध | रु | नी | — |
| प | ध | प | प | गा | मा | गा | रि | गा | रि | गामा | पमा | गा | रि | सा | — |
| भु | ल | वि | मं | — | जु | ला | — | तोऽ | ऽऽ | म | द | नाऽ | ऽ | ऽऽ | ऽ |
| ऩी | ऩी | रि | गा | — | रि | गा | — | गामा | पमा | मा | गा | गामा | प | मागा | मा |
| ऽऽ | ऽ | रीऽ | ऽ॥ | | | | | | | | | | | | |
| गारि | गा | रिसा | ऩी | | | | | | | | | | | | |

राग : पटद्दीप ताल : त्रिताल

आला चंद्रमा अवचित
संध्यापूर्वी नटे पश्चिमा ॥ ध्रु० ॥
सवें गोजिरी प्रिया रोहिणी
धरुनि तीव्रता येई गगनीं
अधर वारुणी सदा पान करी
विस्मित तारा देती पसरुनी
मृदु मागावरि पट-दीपांचा ॥ १ ॥

मा. गो. टेंबे

**भावार्थ**— आपल्या प्रिय व गोजिऱ्या रोहिणीला बरोबर घेऊन, संध्याकाळच्या पूर्वीच हा चंद्रमा आकाशात का बरे आला ? घाईघाईने वर येत असता आपल्या पत्नीबरोबर त्याच्या कामुक चेष्टा तशाच चाललेल्या पाहून तेथील तारका अगदी आश्चर्ययुक्त झाल्यामुळे ( त्या दोघांचा ) मार्ग अधिक प्रकाशमान झाला.

**राग-लक्षणे**—

संध्यापूर्वी — हा राग संध्याकाळच्या पूर्वी गातात.

'ध' 'रु' 'नि' तीव्रता — या रागाला धैवत, ऋषभ व निषाद हे स्वर तीव्र लागतात.

येई गगनीं अ 'ध' 'र' — आरोहात धैवत व ऋषभ हे स्वर वर्ज्य आहेत.

सदा 'पा' 'न' — पंचम व निषाद या स्वरांवर जास्त भर देतात.

मृदु 'मा' 'गा' — मध्यम व गंधार हे स्वर कोमल आहेत.

पट-दीप — रागाचे नाव.

आरोह— ऩी सा ग म प नी सां

अवरोह— सां नी धा प म ग री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| आ | ऽ | ला | ऽ | ऽ | चं | ऽ | द्र | मा | — | — | — | अ | व | चि | त |
| सां | नी | धा | प | म | प | नी | नी | सां | — | — | — | नी | नी | धा | प |
| सं | — | ध्या | — | पू | ऽ | र्वी | ऽ | न | टे | — | प | — | श्चि | मा | ऽ॥ |
| म | — | म | — | म | प | ग | म | प | नी | — | नी | — | सां | धा | प |
| स | वें | — | गो | ऽ | जि | री | ऽ | त्रि | या | — | रो | ऽ | हि | णी | — |
| प | प | — | प | म | प | ग | म | प | नी | — | नी | सां | सां | सां | — |
| ध | रु | नि | ती | — | व्र | ता | — | ये | ऽ | ई | ऽ | ग | ग | नीं | — |
| नीं | नी | नी | नी | — | रीं | सां | — | नी | सां | नी | सां | ध | ध | प | — |
| अ | ध | र | वा | ऽ | रु | णी | ऽ | स | दा | — | पा | ऽ | न | क | री |
| प | प | प | प | म | प | ग | म | प | नी | — | नी | सां | सां | सां | सां |
| वि | — | स्मि | त | ता | ऽ | रा | — | दे | ऽ | ती | — | प | स | रु | नी |
| प | — | नी | सां | गं | रीं | सां | — | नी | सां | सां | — | नी | सां | धा | प |
| मृ | दु | मा | ऽ | गा | ऽ | व | रि | प | ट | दी | ऽ | पांऽ | ऽऽ | चा | ऽ॥ |
| ऩी | सा | ग | म | म | प | ग | म | प | नी | नी | सां | पनी | सांनी | धा | प |

राग : केदार ताल : रूपक

**केदार दावि विराग, शिरिं मंदाकिनी, अंकीं उमा**
**योगी न हा– भोगी ! रुचे त्या नादिनी मृदु मध्यमा ॥ ध्रु० ॥**
**खेळवी जो कंठिं नागा**
**संचार करि निशिं वाउगा**
**धरि मनिं परि तो तीव्रता**
**साधितसे हा शमदमा ॥ १ ॥**

**भावार्थ**— हा केदार. याने मोठ्या विरक्तीचा आवेश आणला आहे खरा. पण ( मस्तकाकडे पहा जरा. ) मस्तकावर स्वर्गंगा ! मांडीवर कोमल कंठी, सिंहकटी अशी पार्वतीमाई ! गळ्यातील नागाबरोबर सदा खेळ ! रात्री–अपरात्री उगीचच भटकणे ! आणि या सर्व गोष्टी रुचणाऱ्या ! तर हा योगी कसा ? नव्हे,–भोगीच. पण हा मनाचा मोठा निग्रही असल्यामुळे शम-दम याच्या स्वाधीन आहेत.

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| केदार | — | रागाचे नाव. |
| रुचे त्या नादिनी मृदु मध्यमा | — | या रागाचा, कोमल मध्यम हा स्वर वादी आहे. |
| ना 'गा' | — | या रागाला गंधार स्वर वर्ज्य आहे. |
| 'ध' 'रि' 'म' 'निं' तीव्रता | — | धैवत, ऋषभ, मध्यम व निषाद हे स्वर तीव्र आहेत. |
| संचार करि निशिं | — | गानसमय रात्रीचा आहे. |

आरोह— सा म प मा प धा नि धा प मा प सां

अवरोह— सां नी·धां प मा प म री सा

| १<br>० | २ | ३ | ४<br>— | ५ | ६<br>— | ७ | १<br>० | २ | ३ | ४<br>— | ५ | ६<br>— | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | के | – | दा | – | र | दा | – | वि | वि |
| | | | | | सा | – | म | – | म | प | – | प | धा |
| रा | – | ग | शि | रिं | मंऽ | ऽ | दा | ऽ | कि | नी | – | अं | ऽ |
| म | – | म | प | प | धानी | सां | धा | प | प | म | – | धा | प |
| कीं | ऽ | उ | मा | ऽ | यो | – | गी | – | न | हा | – | भोऽ | ऽ |
| म | प | म | री | सा | प | – | सां | – | सां | सां | – | धानी | रीं |
| गी | – | रु | चे | ऽ | त्या | – | ना | ऽ | दि | नी | – | मृ | दु |
| सां | – | सां | धा | नि | धा | प | मा | प | प | म | – | धा | प |
| म | – | ध्य | मा | – | ॥ | | | | | | | | |
| म | – | री | सा | – | | | | | | | | खे | – |
| | | | | | | | | | | | | प | – |
| ळ | वी | – | जो | – | कं | – | ठिं | नाऽ | ऽ | गा | ऽ | सं | – |
| प | सां | – | सां | – | सां | – | सां | धानी | रीं | सां | – | सां | – |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>० | २ | ३ | ४<br>— | ५ | ६<br>— | ७ | १<br>० | २ | ३ | ४<br>— | ५ | ६<br>— | ७ |
| चा | — | र | क | रि | नि | शिं | वा | ऽ | उ | गा | — | ध | रि |
| धा | — | नी | सां | रीं | नी | सां | धा | प | प | म | — | सां | सां |
| म | निं | प | रि | — | तो | — | ती | ऽ | त्र | ता | — | सा | — |
| मं | मं | रीं | रीं | — | सां | — | धा | नी | रीं | सां | — | सां | — |
| धि | ऽ | त | से | — | हा | — | श | म | द | मा | — | | |
| धा | नि | धा | प | म | म | — | प | म | री | मा | — | | |

राग : खंबावती ताल : झपताल

**सुधा गान भासे, सुसंवाद सुरुचिर**
**पिपासा हरितसे ॥ ध्रु० ॥**
**वर्ज्य पंचम करि,**
**तीव्र गांधार धरि**
**मनिं भाव मृदुल वरि**
**खंबावती साध्य गानीं परि ही प्रयासें ॥ १ ॥**

**भावार्थ**—या ( खंबावती रागिणीचे ) गायन, वादी संवादी अत्यंत मधुर असल्यामुळे जणू अमृतमयच वाटते. या ( गीतामृताने ) तहान शमते. हीत पंचम वर्ज्य असून गंधार तीव्र असतो. हिच्या मनातील भाव जरी कोमल आहेत, तरी ही खंबावती रागिणी गाणे वाटते तितके सोपे काम नाही.

**राग-लक्षणे**—

सु 'धा' 'गा' न भासे
सुसंवाद — या रागात धैवत हा वादी व गंधार हा स्वर संवादी आहे.
वर्ज्य 'पंचम' करि — या रागात पंचम स्वर वर्ज्य आहे.
तीव्र गांधार 'ध' 'रि' — गांधार, धैवत व ऋषभ हे स्वर तीव्र आहेत.
'म' 'निं' भाव मृदुल वरि — मध्यम व निषाद हे स्वर कोमल आहेत.
खंबावती — रागाचे नाव.

आरोह— सा गा म धा नि सां

अवरोह— सां नि धा गा म री सा

| १<br>+ | २ | ३<br>— | ४ | ५ | ६<br>० | ७ | ८<br>— | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सु | धा | ऽ | गा | – | न |
| | | | | धा | गा | म | री | – | सा |
| भा | – | से | – | सु | सं | ऽ | वा | – | द |
| सा | – | सा | – | सा | गा | म | धा | – | धा |
| सु | रु | चि | र | पि | पा | ऽ | सा | ऽ | ह |
| नि | नि | नि | धा | म | धा | नि | नि | सां | सां |
| रि | त | से | ऽ | | | | | | |
| धा | धा | गा | म | | | | | | |
| व | – | ज्यं | पं | ऽ | च | म | क | रि | – |
| गा | – | म | धा | नि | नि | सां | सां | सां | – |
| ती | – | व्र | गां | – | धा | – | र | ध | रि |
| नि | – | नि | सां | – | सां | – | सां | नि | धा |
| म | निं | भा | – | व | मृ | दु | ल | व | रि |
| गा | गा | म | – | म | गा | म | री | सा | सा |

| १<br>+ | २ | ३<br>— | ४ | ५ | ६<br>० | ७ | ८<br>— | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खं | ऽ | बा | ऽ | व | ती | — | सा | — | ध्य |
| गा | म | धा | नि | नि | सां | — | सां | — | सां |
| गाऽ | ऽऽ | नीं | ऽ | प | रि | ही | — | — | प्र |
| धानि | सांगां | रीं | सां | नि | सां | नि | — | — | सां |
| या | ऽ | सें | ऽ | | | | | | |
| धा | धा | गा | म | | | | | | |

राग : मुलतानी ताल : त्रिताल

अधर रदनिं धरुनि सौधावरि
आरोहण करी मानिनी ।
धरि कोमल तनू, कठोर परि मनिं
प्रिय सकलांहि मुलतानी ॥ ध्रु० ॥
संधिपूर्व पंचमानुरागिणी
पूर्णचतुर अवरोहणीं ॥ १ ॥

**भावार्थ**— ही ' मुलतानी ' ( जातीची स्त्री-नायिका ) सर्वांची लाडकी, हिची अंगकाठी किती नाजुक, पण अतिशय अभिमानी, ओठ दातात धरून पहा कशी लगबगीने गच्चीवर चालली आहे ! ' पंचम ' सख्यावर हिचा भारी जीव. सूर्यास्तापूर्वीच हिची भेट व्हायची. आणि उतरताना पहा,-पहा कशी पुरत्या चातुर्याने ( झरझर ) खाली येत आहे !

**राग-लक्षणे**—

अ 'ध' 'र' रदनिं धरुनि
आरोहण करी — आरोहात धैवत व ऋषभ हे स्वर वर्ज्य आहेत.
' ध ' ' रि ' कोमल — धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत ( अवरोहात ).
कठोर परि ' म ' ' निं ' — मध्यम व निषाद हे स्वर तीव्र आहेत.
मुलतानी — रागाचे नाव.
संधिपूर्व — संध्याकाळच्या पूर्वी, किंवा त्या सुमारास गायन समय आहे.
पंचमानुरागिणी — पंचम स्वर वादी आहे.
पूर्ण चतुर अवरोहणीं — अवरोहात सातही स्वर लागतात.

आरोह— ऩी सा ग मा प नी सां

अवरोह— सां नी ध प मा ग रि सा

| ९<br>० | १० | ११ | १२ | १३<br>— | १४ | १५ | १६ | १<br>+ | २ | ३ | ४ | ५<br>— | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | अ | ध | र | ह |
| | | | | | | | | | | | | प | मा | ग | मा |
| द | निं | ध | रु | नि | -- | सौ | – | धा | ऽ | व | रि | आ | ऽ | रो | ऽ |
| ग | रि | सा | सा | सा | – | ऩी | – | सा | ग | रि | सा | ऩी | सा | मा | ग |
| ह | ण | क | री | ऽ | मा | ऽ | नि | नी | – | – | – | ध | रि | को | ऽ |
| मा | प | नी | ध | प | मा | ग | मा | प | – | – | – | प | प | प | मा |
| म | ल | त | नू | क | ठो | – | र | प | रि | म | निं | प्रि | य | स | क |
| प | मा | ग | मा | प | नी | – | नी | सां | सां | सां | सां | नी | नी | सां | गं |
| लां | – | हि | – | मु | ल | ताऽ | ऽऽ | नी | ऽ | ऽ | ऽ | ॥ | | | |
| रिं | – | सां | – | प | नी | पनी | सांनी | ध | प | ग | मा | | | | |
| सं | – | धि | पू | ऽ | वैं | पं | ऽ | च | मा | ऽ | नु | रा | ऽ | गि | णी |
| प | – | प | प | ग | मा | ग | मा | प | नी | सां | सां | नी | सां | सां | सां |
| पू | – | र्ण | च | तु | र | अ | व | रोऽ | ऽऽ | ह | णीं | ॥ | | | |
| नी | – | सां | गं | रिं | सां | नी | सां | पनी | सांनी | ध | प | | | | |

राग : तोडी | ताल : त्रिताल
|---|---|

**कठिण मन करुनि तोडी, भवजल**
**धरि गा कोमल भाव अंतरीं**
**संपूर्ण राग मोह सोडी ॥ ध्रु० ॥**
**धग वादी, संवादि राहि परि**
**रवि शिरिं तोंवरि गायनीं गोडी ॥ १ ॥**

**भावार्थ**— मनात कोमल भावना बाळगून, पूर्ण निग्रहाने क्रोधमोहादी विकारांवर विजय संपादन करून हा संसारसागर तरून जा. (तोडी रागिणीत) धैवत व गंधार हे स्वर अनुक्रमे वादी व संवादी आहेत. आणि सूर्योदयापासून मध्याह्न होईपर्यंत ही रागिणी आळविण्यात मधुरता असते.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| कठिण 'म' 'न' | — मध्यम व निषाद हे स्वर तीव्र असतात. |
| तोडी | — रागाचे नाव. |
| 'ध' 'रि' 'गा' कोमल भाव | — धैवत, ऋषभ व गंधार हे स्वर कोमल आहेत. |
| संपूर्ण राग | — या रागाला सातही स्वर लागतात, म्हणून संपूर्ण जाती. |
| 'ध' 'ग' वादी संवादि राही | — या रागाचा वादी स्वर धैवत व संवादी स्वर गंधार आहे. |
| रवि शिरिं तोंवरि | — गायन समय दोन प्रहरी बारा वाजेपर्यंतचा आहे. |

आरोह— सा रि ग मा प ध नी सां

अवरोह— सां नी ध प मा ग रि सा

| ९ ० | १० | ११ | १२ | १३ — | १४ | १५ | १६ | १ + | २ | ३ | ४ | ५ — | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ठि | ण | म | न | क | रु | नि | तो | ऽ | डी | – | भ | व | ज | ल |
| ध | सां | नी | ध | प | मा | ग | मा | ग | मा | ध | – | रि | ग | रि | सा |
| ध | रि | गा | ऽ | को | ऽ | म | ल | भा | ऽ | व | अं | ऽ | त | रीं | – |
| ध़ | ऩी | सा | रि | रि | ग | रि | रि | रि | ग | मा | रि | ग | रि | सा | – |
| सं | – | पू | – | र्ण | रा | ऽ | ग | मो | – | ह | सो | ऽ | डी | – | –॥ |
| सा | – | सां | – | नीं | ध | प | प | प | – | मा | ग | मा | धा | – | – |
| ध | ग | वा | – | दी | – | सं | ऽ | वा | – | दि | रा | ऽऽ | हि | प | रि |
| ग | ग | मा | – | ध | – | मा | ध | सां | – | सां | सां | रिंगं | रिं | सां | सां |
| र | वि | शि | रिं | तों | ऽ | व | रि | गा | – | य | नीं | गो | ऽ | डी | –॥ |
| ध | नी | सां | रिं | रिं | गं | रिं | सां | सां | – | नी | ध | ग | मा | ध | – |

राग : पूर्वी　　　　　　　　　　　　　　　　ताल : त्रिताल

कोमल राधा तीव्र गमन करि
भार घेउनी मृदु मध्यावरि
पयोधरें शिणली सुकुमारी ॥ ध्रु. ॥
दीप उजळण्यापूर्वी रमणी
सदन गांठण्या होइ घावरी ॥ १ ॥

भावार्थ— ही कोमलप्रकृती राधा, आपल्या तितक्याच नाजुक कमरेवर (जलकलशाचा) भार घेऊन किती जलद गतीने चालली आहे! (ही सुकुमारी इतकी नाजुक की) स्वतःच्या उरोजांचासुद्धा तिला भार वाटतो! दिवेलागणीपूर्वी आपण घर कसे गाठू या विचाराने बिचारी अगदी कावरीबावरी झाली आहे!

राग-लक्षणे—

| | |
|---|---|
| कोमल 'रा' 'धा' | — या रागाला ऋषभ व धैवत कोमल आहेत. |
| तीव्र 'ग' 'म' 'न' | — गंधार, मध्यम व निषाद हे स्वर तीव्र आहेत. |
| भार घेउनी मृदुमध्यावरि | — कोमल मध्यम बराच प्रमुख आहे. |
| दीप उजळण्यापूर्वी | — पूर्वी हे रागाचे नाव व सायंकाळ हा गाण्याचा समय. |

आरोह— ऩी रि गा मा ध नी सां

अवरोह— रिं नी ध प, मा गा म गा, मा गा रि सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| को | ऽ | म | ल | रा | ऽ | धा | ऽ | ती | – | त्र | ग | म | न | क | रि |
| गा | रि | गा | म | गा | रि | गा | मा | प | – | प | मा | गा | म | ग | ग |
| भा | – | र | घे | – | उ | नी | ऽऽ | मृ | दु | म | ऽ | ध्या | ऽ | व | रि |
| ऩी | – | रि | गा | – | रि | गा | माप | मा | ध | मा | गा | मा | गा | रि | सा |
| प | यो | – | ध | रें | ऽ | शि | ण | ली | ऽ | सु | कु | मा | ऽ | री | –॥ |
| सा | सां | – | नी | ध | प | प | मा | प | ध | प | मा | गा | म | गा | – |
| दी | – | प | उ | ज | ळ | ण्या | ऽ | पू | – | र्वी | – | र | म | णी | – |
| गा | – | गा | गा | मा | ध | मा | ध | सां | – | सां | – | नी | रिं | सां | – |
| स | द | न | गां | ऽ | ठ | ण्या | – | हो | ऽ | ई | ऽ | घा | ऽ | ब | री॥ |
| ध | नी | सां | सां | गां | रिं | सां | – | नी | ध | प | मा | गा | म | रि | गा |

**राग : भैरव** **ताल : त्रिताल**

**बालरवी उगवला हा**
**जनानंदकर ॥ ध्रु. ॥**
**कोमलता धरी महा तीव्र परी**
**नगवर भालीं येवोनी**
**जोडी भैरवा कर ॥ १ ॥**

**भावार्थ—** सकल जनांना आनंद देणारा हा बालसूर्य उदय पावला आहे. आता तो कोमल दिसतो, पण कालान्तराने कमालीचा उग्र होतो. हलके हलके पर्वतशिखरावर आल्यावर, तेथल्या 'भैरव'रूपधारी महेशाला तो आपले किरणरूपी हात जोडून वंदन करीत आहे.

**राग-लक्षणे —**

| | |
|---|---|
| बालरवी उगवला | — गाण्याचा समय प्रातःकाल, सूर्योदयानंतरचा आहे. |
| कोमलता 'ध' 'री' 'म' | — धैवत, ऋषभ व मध्यम हे स्वर कोमल आहेत. |
| तीव्र परी 'न' 'ग' | — परंतु निषाद व गंधार हे स्वर तीव्र आहेत. |
| 'भैरवा' कर | — रागाचे नाव 'भैरव' ध्वनित केले आहे. |

आरोह— सा रि गा म प ध नी सां (लय – विलंबित)
अवरोह— सां नी ध प म गा म रि सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | | वा | ऽ | ल | र | वी | – | ऽ | – | उ | – | ग | – |
| | | | | गा | म | प | प | ध | – | प | – | प | – | प | – |
| व | – | ला | – | – | – | ऽ | – | हा | – | – | – | ज | ना | ऽ | नं |
| प | – | म | – | – | – | रि | – | सा | – | – | – | सा | ध | – | ध |
| ऽ | द | क | र ॥ | | | | | | | | | | | | |
| – | प | म | म | | | | | | | | | | | | |
| | | | | को | – | म | ल | ता | – | ध | री | म | हा | ऽ | ती |
| | | | | म | – | म | म | ध | – | ध | ध | ध | ध | सां | सां |
| – | ब्र | प | री | न | ग | व | र | आ | ऽ | लीं | – | येऽ | ऽऽ | वो | ऽ |
| – | सां | सां | सां | ध | ध | ध | ध | नी | सां | सां | – | नीसां | रिंसां | नी | ध |
| – | – | नी | – | जोऽ | ऽऽ | ऽ | – | डी | – | भै | – | र | – | वाऽ | ऽऽ |
| – | – | प | – | धध | पम | प | – | म | – | गा | – | म | – | गाम | पम |
| ऽ | ऽ | क | र ॥ | | | | | | | | | | | | |
| गा | रि | रि | सा | | | | | | | | | | | | |

राग : वसंत

ताल : त्रिताल

कोमल भाव धरी वनदेवी
येई वसंत-नाथ चिरकालें
मृदुल मध्यमा तीव्रता किती गमनीं दावीं ॥ ध्रु. ॥
निशोत्तरीं तार षड्जवादिनी
विपंचमा आरोही गगनीं
मृदुलरवें मध्यावरि रमुनी
मत्त कोकिला पंचम नादवि ॥ १ ॥

**भावार्थ**— आपला ' वसंत '-पती दीर्घकालानंतर भेटीस येत आहे, म्हणून वनदेवी किती नाजुक भावनेने त्याला सामोरी जात आहे ! हिची कमर नाजुक पण चाल मात्र तीव्र आहे. उत्तर रात्रीचा समय झाला आहे. तार षड्जाचा ती वारंवार आश्रय घेते. चढणीची जागा आली असता पंचमाचा त्याग करते, मध्येच कोमल आवाजात ती रंगून जाते; आणि याच वेळी कोकिळा आपल्या पंचम स्वराने आसमंत निनादून सोडते.

राग-लक्षणे —

| | | |
|---|---|---|
| कोमल भाव 'ध' 'री' | — | धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत |
| वसंत | — | रागाचे नाव. |
| मृदुल मध्यमा | — | कोमल मध्यम लागतो. |
| तीव्रता 'ग' 'म' 'नीं' दावी | — | गंधार, मध्यम व निषाद हे स्वर तीव्र लागतात ( मध्यम दोन्ही प्रकारचे लागतात. ) |
| निशोत्तरीं | — | गायनसमय उत्तर रात्रीचा. |
| तार षड्जवादिनी | — | तारषड्ज हा स्वर वादी आहे. |
| विपंचमा आरोही | — | आरोहात पंचम स्वर वर्ज्य आहे. |
| मत्त कोकिळा पंचम नादवि | — | अवरोहात मात्र पंचम स्वर लागतो. ( अवरोह संपूर्ण ) |

आरोह— सा गा मा ध रिं सा

अवरोह— सा नी ध प, मा गा, मा ध मा गा रि सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | | | | | | | | | | को | ऽ | म | लऽ |
| | | | | | | | | | | | | नी | सां | नी | धप |
| भा | – | व | ध | री | ऽ | व | न | दे | – | वी | – | ये | ऽ | ई | ऽ |
| प | – | प | प | मा | गा | मा | ध | रिं | – | सां | – | मा | ध | नी | सां |
| व | सं | – | त | ना | ऽ | ऽ | थ | चि | र | का | ऽ | लें | – | – | – |
| नी | ध | – | प | प | मा | गा | गा | गा | मा | गा | रि | सा | – | – | – |
| मृ | दु | ल | म | – | ध्य | मा | ऽ | ती | – | व्र | ता | ऽ | किं | ती | – |
| सा | सा | सा | म | – | म | म | गा | मा | – | ध | नी | सां | सां | सां | – |
| ग | म | नीं | ऽ | दा | ऽ | ऽ | ऽ | वी | ऽ | – | – | ॥ | | | |
| सां | रिं | सां | रिं | नी | सां | नीं | ध | मा | धा | – | – | | | | |
| | | | | | | | | | | | | नि | शो | ऽ | त |
| | | | | | | | | | | | | मा | ध | नी | सां |
| रीं | – | ता | – | र | ष | – | ड्ज | वा | ऽ | दि | नी | वि | पं | – | च |
| सां | – | सां | – | सां | सां | – | सां | नी | सां | रिं | सां | ध | सां | – | सां |
| मा | – | आ | – | रो | ऽ | ही | ऽ | ग | ग | नीं | – | मृ | दु | ल | र |
| सां | – | सां | – | नी | सां | सां | – | सां | सां | नीं | – | सां | गां | रिं | मां |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ ० | १० | ११ | १२ | १३ — | १४ | १५ | १६ | १ + | २ | ३ | ४ | ५ — | ६ | ७ | ८ |
| वें | ऽ | म | – | ध्या | – | ब | रि | र | मु | नी | – | म | – | त | को |
| गां | रिं | सां | – | सां | – | नी | धप | गा | मा | गा | – | सा | – | सा | म |
| ऽ | कि | ला | – | पं | ऽ | च | म | ना | ऽ | द | वि | ॥ | | | |
| म | म | म | गा | ध | सां | नी | धा | प | मा | गा | मा | | | | |

◆ ◆

**राग : परज** **ताल : त्रिताल**

**परज तलवार ! धरिसी कोमलता कैसी !**
**कार्य नाशिनी, कठिण निगम उभयविध**
**वरि सुविचार ॥ ध्रु. ॥**
**सरली तीन याम ही यामिनी**
**तार षड्ज पंचमा नादवुनी**
**हटवि झणिं अरि, होईल तरि अनिवार ॥ १ ॥**

**भावार्थ**— ( ऊठ ) खड्ग उपस ! कार्यहानिकारक हा हळवेपणा तुझ्याठायी कुठून आला ! ( प्रवृत्ती व निवृत्ती ) ही दोन शास्त्रे कठीण खरी, पण त्याचा योग्य निवाडा करून सुविचाराचा आश्रय कर !

मध्यरात्र तर उलटून गेली. आता आपल्या उंच ( व भयंकर ) गर्जनेने शत्रूला मागे हटव. ( वेळीच ही गोष्ट केली नाहीस तर ) शत्रू अनावर झाल्याशिवाय राहणार नाही.

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| परज | — | रागाचे नाव |
| 'ध' 'रि' सी कोमलता | — | या रागाला धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत. |
| कठिण 'नि' 'ग' | — | निषाद व गंधार हे तीव्र आहेत. |
| 'म' उभयविध | — | कोमल व तीव्र हे दोन्ही मध्यम लागतात. |
| सरली तीन याम यामिनी | — | गायनसमय उत्तर रात्रीचा. |
| तार षड्ज पंचमा नादवुनी | — | तार षड्ज हा वादी व पंचम हा संवादी स्वर आहे. |

आरोह— सा ग मा ध नी सां

अवरोह— सां नी ध प, मा प ध प गा म गा, मा गा रि सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | प | र | ज | त | ल | वा | – | र | – | ध | रि | सी | ऽ |
| | | | ध | प | ध | मा | ध | सां | – | सां | – | ध | सां | नी | ध |
| को | ऽ | म | ल | ता | ऽ | कै | ऽ | सी | का | – | यँ | ना | ऽ | शि | नी |
| नी | ध | प | मा | प | मा | गा | म | गा | मा | – | गा | मा | गा | रि | सा |
| क | ठि | ण | नि | ग | म | – | उ | भ | य | वि | ध | व | रि | सु | वि |
| सा | ऩी | सा | सा | गा | गा | – | मा | मा | ध | मा | ध | नी | ध | मा | ध |
| चा | – | र ॥ | | | | | | | | | | | | | |
| सां | – | सां | | | | | | | | | | | | | |
| स | र | ली | ती | ऽ | न | या | ऽ | म | ही | – | या | ऽ | मि | नी | – |
| गा | गा | गा | मा | ध | मा | ध | नी | सां | सां | – | सां | नी | रिं | सां | – |
| ता | – | र | ष | ऽ | ड्ज | पं | – | च | मा | – | ना | – | द | बु | नी |
| सां | – | सां | गां | रिं | सां | सां | – | सां | सां | – | नी | – | ध | रिं | नी |
| ह | ट | वि | झ | णि | अ | रि | हो | ऽ | ई | ऽ | ल | त | रि | अ | नि |
| सां | गां | रिं | मां | गां | रिं | सां | मा | ध | नी | सां | नी | ध | प | मा | ध |
| वा | – | र ॥१॥ | | | | | | | | | | | | | |
| सां | – | सां | | | | | | | | | | | | | |

राग : भीमपलास                                                    ताल : त्रिताल

फुलला भीमपलाश पाहुनी
रसिक रागिणी, कोमल गमनीं
आरोहण करि निराधारा ॥ ध्रु. ॥
सौम्य किरण संध्या पूर्वींचे
स्वेद बिंदु चुंबिति भालींचे
मध्यावरि विश्राम घेतसे
धरी तव्रिता अवरोहपरा ॥ १ ॥

**भावार्थ**— फुलांनी डंवरलेला पळसाचा वृक्ष पाहून ही मंद पदन्यास करणारी, रसिक ' रागिणी ' ( नावाची नायिका ) कुणाचेही साहाय्य न घेता त्यावर कशी चढ्न पहात आहे, बघा ! संध्यासमयापूर्वीचे कोमल किरण सगळीकडे पसरलेले आहेत, आणि ते किरण या रागिणीच्या कपाळावरचे घर्मबिंदू जणू टिपीत आहेत. ( श्रम झाल्याने वृक्षाच्या ) मध्यावर ती विसावा घेते, आणि तशीच उत्कटतेने सत्वर खाली उतरत आहे, पहा !

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| भीमपलाश | — | रागाचे नाव. |
| कोमल 'ग' 'म' 'नीं' | — | या रागाला गंधार, मध्यम व निषाद कोमल लागतात. |
| आरोहण करि निरा'धा''रा' | — | आरोहात धैवत व ऋषभ वर्ज्य आहेत. |
| सौम्य किरण संध्यापूर्वींचे | — | संध्यापूर्वकाली म्हणजे चौथ्या प्रहरी हा राग गातात. |
| ' मध्या 'वरि विश्राम | — | मध्यम स्वर हा वादी आहे. |
| 'ध''री' तीव्रता अवरोहपरा | — | अवरोहात तीव्र धैवत व ऋषभ लागतात. |

आरोह— नि़ सा ग म प नि सां
अवरोह— सां नि धा प म ग री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| फु | ल | ला | ऽ | भी | ऽ | म | प | ला | – | – | श | पा | ऽ | हु | नी |
| म | ग | री | सा | री | नि़ | सा | म | म | – | – | म | ग | म | री | सा |
| र | सि | क | रा | ऽ | गि | णी | – | को | ऽ | म | ल | ग | म | नीं | – |
| नि़ | नि़ | प़ | नि़ | सा | सा | सा | – | नि़ | नि़ | सा | ग | री | री | सा | – |
| आ | ऽ | रो | ऽ | ह | ण | क | रि | नि | रा | ऽ | धा | ऽ | रा | ऽ | –॥ |
| ग | म | प | नि | प | नि | सां | सां | नि | धा | प | म | प | ग | म | – |
| सौ | – | म्य | कि | र | ण | सं | ऽ | ध्या | ऽ | ऽ | पू | ऽ | वीं | चे | – |
| प | – | प | प | म | प | ग | म | प | नि | प | नि | सां | सां | सां | – |
| स्वे | – | द | बिं | – | दु | चुं | – | बि | ति | भाऽ | ऽ | लींऽ | ऽ | चे | ऽ |
| नि | – | नि | सां | – | सां | नि | – | नि | नि | पनि | सां | पनि | सां | धा | प |
| म | – | ध्या | – | व | रि | वि | ऽ | श्रा | ऽ | म | घे | ऽ | त | से | – |
| प | – | प | – | म | प | ग | म | प | नि | प | नि | सां | सां | सां | – |
| ध | री | ऽ | ती | ऽ | व्र | ता | ऽ | अ | व | रो | ऽ | ह | प | रा | – |
| नि | सां | मं | गं | रीं | रीं | सां | – | नि | धा | प | म | ग | री | सा | – |

राग : बागेश्री

ताल : त्रिताल

रागिणी अतुल वागीश्वरी
ही गमनीं मृदुल निशिं विहार करि ॥ ध्रु. ॥
प्रबल भाव मनिं दयित मीलनीं
परि दाविना ती आरोहणीं
वल्लभ धरि तीव्रता मनीं ॥ १ ॥

**भावार्थ**— ही वागीश्वरी रागिणी ( अर्थात ' बागेश्री ' ) खरोखर अद्वितीयच म्हटली पाहिजे. हिची चालचलणूक मृदुमधुर असून हिचा विहार रात्रीच्या वेळी मुक्त असतो. हिचा वल्लभ तिच्या मीलनास अत्युत्सुक झालेला असताही आणि तिच्या स्वतःच्या मनीचा मीलनभाव कमी उत्सुक नसतानाही, ती मात्र ( संयमपूर्वक ) तो व्यक्त करीत नाही. ( अशी ही शालीन ! )

**राग-लक्षणे**—

| | | |
|---|---|---|
| वागीश्वरी | — | रागाचे नाव " बागेश्री ". ही वागीश्वरी ( वाक् + ईश्वरी ) या शब्दाची व्युत्पत्ती आहे असे मानतात. |
| 'ग' 'म' 'नीं' मृदुल | — | या रागाला गंधार, मध्यम व निषाद हे स्वर कोमल लागतात. |
| निशिं विहार करि | — | गानसमय रात्रीचा आहे. |
| प्रबल भाव 'म' 'नीं' | — | वादी स्वर मध्यम व संवादी निषाद आहे. |
| 'प' 'रि' दाविना ती आरोहणीं | — | आरोहात रिषभ व पंचम हे स्वर वर्ज्य आहेत. |
| 'ध' 'रि' तीव्रता | -- | धैवत व रिषभ हे स्वर तीव्र आहेत |

आरोह— नि़ सा ग म धा नि सां

अवरोह— सां नि धा म प धा म ग री सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| | | | | – | रा | ऽ | गि | णी | – | – | अ | तु | ल | वा | ऽ |
| | | | | – | ग | ग | म | धा | – | – | नि | धा | म | ग | री |
| गीऽ | ऽ | श्व | री | ऽ | ही | – | ग | म | नीं | मृ | दु | ल | नि | शिं | वि |
| रीग | म | ग | री | सा | सा | – | ध़ | नि़ | सा | री | नि़ | सा | म | ग | री |
| हा | – | र | क | री॥ | | | | | | | | | | | |
| सा | – | री | नि़ | सा | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | प्र | व | ल | भा | ऽ | व | म | निं |
| | | | | | | | | म | म | म | म | म | प | ग | म |
| द | यि | त | मी | ऽ | ल | नीं | – | प | रि | दा | ऽऽ | वि | ऽ | ना | – |
| म | धा | नि | नि | सां | सां | सां | – | धा | नि | सां | मंगं | रीं | रीं | सां | – |
| ती | ऽ | आ | ऽ | रोऽ | ऽऽ | ह | णीं | व | ऽ | ल्ल | भ | ध | रि | ती | ऽ |
| नि | सां | नि | सां | निसां | रींसां | नि | धा | धा | नि | सां | मं | गं | रीं | सां | नि |
| व्र | ता | ऽ | म | नीं ॥१॥ | | | | | | | | | | | |
| धा | म | ग | री | सा | | | | | | | | | | | |

राग : जैजैवन्ती ताल : झपताल

नव सुरस माला वैजयंती गळां
घालुनी हरि कुठे मध्यनिशि चालला ॥ ध्रु. ॥
वृषभावरी भार, पंचमा सखी चतुर
उभय गानिं रुचिर, धरि तीव्रतेला ॥ १ ॥

**भावार्थ**— अत्यंत सुगंधयुक्त व सदैव टवटवीत अशी वैजयंती माळ गळयात घालून हा कृष्णसखा मध्यरात्रीचा कुठे वरे चालला आहे? (काय नवल!) एका नंदीवर तो स्वार झाला आहे. (मार्ग दाखविण्यासाठी) पंचमा नावाची हुषार सखी त्याने वरोवर घेतली आहे. आणि दोघेही, गोड आणि उत्कट गाणीं गुणगुणत चालली आहेत.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| वैजयंती | — या मूळ नावाचे प्रचारात 'जैजैवंती' हे नाव आहे. |
| मध्यनिशि | — मध्यरात्रीच्या सुमारास गायन समय. |
| वृषभावरी भार (ऋषभावरी भार) | — या रागाचा ऋषभ हा स्वर वादी आहे. |
| पंचमा सखी | — पंचम स्वर संवादी आहे. |
| उभय 'गा' 'निं' | — गंधार व निषाद हे स्वर कोमल व तीव्र दोन्ही प्रकाराने लागतात. |
| 'ध' 'रि' तीव्रतेला | — धैवत व ऋषभ तीव्र लागतात. |

आरोह— सा री गा म प धा नी सां

अवरोह— सां नि धा प म गा री ग री सा

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>+ | २ | ३<br>— | ४ | ५ | ६<br>— | ७ | ८<br>— | ९ | १० |
| न | व | सु | र | स | मा | ऽ | ला | – | – |
| ग | री | सा | नी़ | सा | धा़ | नि़ | री | – | – |
| वै | – | ज | यं | ऽ | तीऽ | ऽऽ | ग | ळां | ऽ |
| री | – | गा | म | प | मगा | रीग | री | नी़ | सा |
| घा | – | लु | नी | ऽ | ह | रि | कु | ठे | ऽ |
| म | – | प | नी | सां | नि | धा | प | म | गा |
| म | – | ध्य | नि | शिं | चाऽ | ऽऽ | ल | ला | ऽ॥ |
| री | – | गा | म | प | पधा | पधा | म | गा | री |
| वृ | ष | भा | – | व | री | ऽ | भा | – | र |
| म | प | नी | – | नी | नी | सां | सां | – | सां |
| पं | – | च | माऽ | ऽऽ | स | खी | च | तु | र |
| नी | – | सां | रींगां | मंगां | रीं | गं | रीं | सां | सां |
| उ | भ | य | गा | ऽ | निंऽ | ऽ | रु | चि | र |
| सां | नि | धा | प | धा | मगा | री | ग | री | सा |
| ध | रि | तीऽ | ऽऽ | त्र | तेऽ | ऽऽ | ला | ऽ | ऽ |
| नी़ | सा | रीगा | मप | धा | मगा | रीग | री | नी | सा |

राग : बहार

ताल : एकताल

मृदुल मग तीव्रता धरि बहार हा, कसा !
दोन निषादींसवें नृत्य करि
मध्यावरि सांवरीत भार हा ॥ ध्रु. ॥
स्नेहाङ्कित परिवार बहुपरि
मध्यनिशीं कां करितो विहार हा ! ॥ १ ॥

भावार्थ— हा 'बहार' ( नावाचा नायक ) वास्तविक मनाने किती कोमल ! पण आज मात्र त्याने असा कठोरपणा का बरे धारण केला आहे ? याचा मित्रपरिवारही मोठा आहे, पण ( त्यांचा त्याग करून ) या दोन भिल्लिणीबरोबर हा मध्यरात्रीचा कां विहार करतो आहे बरे !

राग-लक्षणे—

| | |
|---|---|
| मृदुल 'म' 'ग' | — मध्यम व गंधार हे स्वर कोमल आहेत. |
| तीव्रता 'ध' 'रि' | — धैवत व ऋषभ हे स्वर तीव्र आहेत. |
| बहार | — रागाचे नाव. |
| दोन निषादींसवें | — कोमल व तीव्र हे दोन्ही निषाद लागतात. |
| मध्यावरि सांवरीत भार | — मध्यम स्वर वादी आहे. |
| मध्यनिशीं...विहार | — गानसमय मध्यरात्रीचा आहे. |

आरोह— सा ग म नि धा नी सां

अवरोह— सां नि – प म प ग म री सा

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | ० | | — | | ० | | — | | —— | |
| मृ | दु | ल | म | ग | ती | ऽ | व्र | ता | ऽ | ध | रि |
| रीं | नी | सां | नि | प | नि | म | प | म | प | ग | म |
| व | हा | ऽ | र | हा | ऽ | ऽ | क | सा | ऽ | ऽ | ऽ |
| म | नि | धा | नी | सां | नी | सां | रीं | नी | सां | नी | सां |
| दो | – | न | नि | षा | ऽ | दीं | ऽ | स | वें | ऽ | नृ |
| नि | – | प | प | म | प | ग | ग | ग | ग | म | री |
| – | त्य | क | रि | म | – | ध्या | – | व | रि | सां | – |
| – | री | सा | सा | सा | – | म | – | म | प | ग | – |
| व | री | ऽ | त | भाऽ | ऽऽ | ऽ | र | हा | ऽ | ऽ | ऽ॥ |
| म | नि | धा | नी | धानी | सांरीं | गं | रीं | नी | सां | धा | नि |
| स्ने | ऽ | हां | ऽ | कि | त | प | रि | वा | – | र | ब |
| ग | म | नि | धा | नी | सां | नी | नी | सां | – | सां | नी |
| दु | प | री | ऽ | म | – | ध्य | नि | शीं | – | कां | ऽ |
| सां | सां | नि | धा | सां | – | मं | मं | रीं | – | नी | सां |
| क | रि | तो | ऽ | वि | हा | ऽ | र | हा | ऽ | ऽ | –॥ |
| नि | प | ग | म | म | नि | धा | नी | सां | नी | सां | – |

राग : जीवनपुरी ताल : त्रिताल

जीवनपुरीं वहासी, मनुजा
कामादिक तीव्रारि कवळुनि
कैसा बंधनिं सांपडलासी ॥ ध्रु. ॥
सुख मत्त हयाऽरोहणीं नच गा
मनीं सर्वदा वरी मृदुलता,
मग धनि चिरसौख्याचा होसी ॥ १ ॥
प्रहर एक दिन लोटुनि गेला,
प्रबल होत धग, मित्र वरि आला
करुणरसें झणिं आळवि त्यासी ॥ २ ॥

**भावार्थ**-- मानवपुत्रा, कामक्रोधादी जबरदस्त शत्रूंनी वेधला जाऊन, जीवनामध्ये किती जखडून गेला आहेस तू ! ( ऐहिक सुखरूपी ) बेफाम अश्वावर स्वार होण्यात काही आनंद नाही; तर मनात सर्वदा कोमल भाव नांदू दिल्यानेच शाश्वत सुख तुझ्याकडे चालून येईल. आता एक प्रहर दिवस उलटून गेला, सूर्य चांगला वर आल्यामुळे त्याची उष्णता तीव्र होत आहे. तेव्हा करुणरसपूर्ण गीतांनी तू त्याची आळवणी करण्यास आरंभ कर.

**राग-लक्षणे**--

| | | |
|---|---|---|
| जीवनपुरीं | — | रागाचे नाव. |
| तीव्रा 'रि' कवळुनि | — | या रागाला ऋषभ तीव्र लागतो. |
| वरी मृदुलता 'म' 'ग' 'ध' 'नि' | — | मध्यम, गंधार, धैवत व निषाद हे स्वर कोमल लागतात. |
| आरोहणीं नच 'गा' | — | आरोहात गंधार स्वर वर्ज्य आहे. |
| प्रहर एक दिन लोटुनि गेला | — | गायनसमय दिवसाचा एक प्रहर झाल्यानंतरचा. |
| प्रबल होत 'ध' 'ग' | — | वादी धैवत व संवादी गंधार हे स्वर आहे. |
| करुणरसें आळवि | -- | हा राग करुणरसाला पोषक आहे. |

आरोह— सा री म प ध नि सां
अवरोह— सां नि ध प, म प ध म प, ग री सा

| ९<br>० | १० | ११ | १२ | १३<br>— | १४ | १५ | १६ | १<br>+ | २ | ३ | ४ | ५<br>— | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जी | ऽ | व | न | पु | री | ऽ | व | हा | – | सी | ऽ | म | नु | जा | ऽ |
| प | सां | ध | प | प | ग | म | प | ध | – | म | प | ग | ग | री | सा |
| का | – | मा | – | दि | क | ती | ऽ | त्रा | ऽ | रि | क | व | ळु | नि | – |
| ध़ | – | ध़ | – | सा | सा | री | म | म | प | ग | ग | ग | री | सा | – |
| कै | – | सा | – | वं | – | ध | निं | सां | – | प | ड | लाऽ | ऽऽ | सीऽ ॥ | |
| सा | – | सां | – | सां | – | सां | सां | नि | – | सां | सां | निसां | रींसां | ध | प |
| सु | ख | म | – | स | ह | या | – | रो | – | ह | णीं | न | च | गा | – |
| म | म | म | – | म | म | प | – | ध | – | ध | ध | सां | सां | सां | – |
| म | नीं | – | स | – | वं | दा | – | व | री | – | मृ | दु | ल | ता | ऽ |
| प | गं | – | रीं | – | रीं | सां | – | नि | सां | – | नि | सां | रीं | ध | प |
| स | ग | ध | नि | चि | र | सौ | – | ख्या | – | चा | – | होऽ | ऽऽ | ऽ सीऽ ॥ | |
| प | ध | री | सां | री | नि | सां | – | ध | – | प | – | मप | धनी | सां | धप |
| प्र | ह | र | ए | – | क | दि | न | लो | ऽ | टु | नि | गे | ऽ | ला | – |
| ध | ध | ध | निं | – | ध | प | प | म | प | ग | ग | री | री | सा | – |
| प्र | ब | ल | हो | ऽ | त | ध | ग | मि | त्र | व | रि | आ | ऽ | ला | ऽ |
| ध | ध | ध | ध | ऽ | सां | सां | सां | नि | नी | सा | सां | ध | नि | ध | प |
| क | रु | ण | र | सें | – | झ | णिं | आ | ळ | वि | – | साऽ | ऽऽ | ऽ सीऽ ॥ | |
| म | प | ध | सां | गं | – | रीं | सां | ध | ध | सां | – | मप | धनि | सां | धप |

**राग : मालकंस** **ताल : झपताल**

**हा स्वर-सरसिं रमे मालकंस,**
**जणु राजहंस डोले मानस-सलीलीं ॥ ध्रु. ॥**
**मृदु गान, मृदु धाम, मध्यावरि विराम**
**त्यजुनि परि आराम,**
**विहरे निशोत्तरिं मराली ॥ १ ॥**

**भावार्थ**— स्वर-सरोवरात विहार करणारा हा 'मालकंस' राग, मानस-सरोवरात विहार करणाऱ्या एखाद्या राजहंसाप्रमाणे भासतो आहे. (मालकंसरूपी) या राजहंसाचे गाणे किती गोड! निवासस्थान किती नाजूक! (असे असूनही) रात्रीच्या उत्तर समयी (सरोवराच्या) मध्यभागी याचा अविश्रान्त विहार चालला आहे.

**राग-लक्षणे**—

| | |
|---|---|
| मालकंस | — रागाचे नाव. |
| मृदु 'गा' 'न' मृदु 'धा' 'म' | — गंधार, निषाद, धैवत, व मध्यम हे स्वर कोमल आहेत. |
| मध्यावरि विराम | — मध्यम स्वर वादी आहे. |
| त्यजुनि 'प' 'रि' | — पंचम व ऋषभ हे स्वर वर्ज्य आहेत. |
| विहरे निशोत्तरिं | — गायनसमय उत्तर रात्रीचा आहे. |

आरोह— सा ग म ध नि सां
अवरोह— सां नि ध म ग सा

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | — | | | ० | | — | | |
| हाऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ | स्व | र | स | र | सिं | र |
| नि़सा | गम | धनि | सां | सां | सां | सां | ध | म | ध |
| मे | — | मा | ऽ | ल | कं | ऽ | स | ज | णु |
| नि | — | ध | नि | ध | म | ग | सा | नि़ | सा |
| रा | ऽ | ज | हं | — | स | डो | ऽ | ले | — |
| गं | मं | गं | सां | — | सां | नि | सां | सां | — |
| मा | ऽ | न | स | स | लीऽ | ऽऽलीं | ऽऽ | ऽऽ | ऽ ॥ |
| नि | सां | ध | म | म | गम | धनिसां | निध | मग | सा |
| मृ | दु | गा | — | न | मृ | दु | धा | — | म |
| ग | म | ध | — | नि | नि | सां | सां | — | सां |
| म | — | ध्या | — | व | रि | वि | रा | ऽ | म |
| नि | — | सां | — | सां | ध | नि | ध | म | म |
| त्य | जु | नि | प | रि | आ | ऽ | रा | ऽ | म |
| नि | नि | सां | गं | सां | गं | मं | गं | सां | सां |
| वि | ह | रे | ऽ | — | नि | शोऽ | ऽऽ | त्त | रिं |
| नि | सां | ध | म | — | ग | मध | निसां | ध | म |
| म | राऽ | ऽऽ | ऽ | — | लीऽ | ऽऽ | ऽऽ | ऽऽ | ऽ ॥ |
| ग | गम | धनि | सां | — | निनि | धध | मम | गग | सा |

राग : भैरवी ताल : त्रिताल

नामें भैरवी केवी !
गमनिं धरी किति कोमलता ही
करुण भाव सकलाङ्गीं दावी ॥ ध्रु. ॥
सुप्रभातिं नवलीला दावुनि
उत्तराङ्गिं अरसिकाहि गुंगवी ॥ १ ॥

भावार्थ—हिचे चालणे किती नाजूक ! करुण भाव तर सर्वाङ्गात भरलेला, प्रभातकाळी आपल्या नवोनव विलासाने एखाद्या अरसिकालाही भुरळ पडावी अशी ही कोमल ललना ! पण काय आश्चर्य ! हिचे नाव मात्र 'भैरवी'! (म्हणजे रौद्रभीषण). नामाकृतीत काही तरी मेळ !

राग-लक्षणे—

भैरवी — रागाचे नाव.

'ग' 'म' 'निं' 'ध' 'री'
किति कोमलता — गंधार, मध्यम निषाद, धैवत व ऋषभ हे स्वर कोमल आहेत.

करुण भाव सकलाङ्गीं — हा राग करुण रसाला पोषक आहे.

सुप्रभातिं — गायन समय सकाळचा आहे.

उत्तराङ्गिं — सप्तकाच्या उत्तराङ्गात हा राग जास्त खुलतो.

आरोह— सा रि ग म प ध नि सां

अवरोह— सां नि ध प म ग रि सा

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | | | — | | | | + | | | | — | | | |
| ना | ऽ | में | ऽ | ऽ | मै | ऽ | र | वी | – | – | – | के | – | वी | – |
| सा | ग | रि | सा | नि | सा | ग | रि | सा | – | – | – | री | – | ग | – |
| ग | म | निं | ध | री | कि | ति | – | को | ऽ | म | ल | ता | ऽ | हो | – |
| सा | रि | ग | म | म | म | म | – | ग | म | प | म | ग | रि | सा | – |
| क | रु | ण | भा | ऽ | व | स | क | लां | ऽ | गीं | ऽ | दाऽ | ऽऽ | वीऽ | ऽ |
| प | प | प | प | ध | प | म | प | ग | री | ग | सा | सारी | गम | गरी | ग |
| सु | – | प्र | भा | – | तिं | न | व | ली | – | ला | ऽ | दा | ऽ | वु | नि |
| ग | – | म | ध | – | ध | नि | नि | सां | – | सां | नि | सां | गं | रिं | सां |
| उ | ऽ | त्त | रां | ऽ | गिं | अ | र | सि | का | ऽ | हि | गुंऽ | ऽ | ग | वी॥ |
| सां | गं | रीं | गं | सां | रीं | नि | सां | नि | ध | प | म | गम | प | ग | म |

**टीपः**—– या रागिणीत रि, ग, म, ध, नि हे स्वर जरी कोमल असले तरी, राग बिघडवू न देता तीव्र स्वरांचाही उपयोग करतात. वरील गीतात काही ठिकाणी तीव्र ऋषभ वापरला आहे.

मूल्य तीन रुपये

## काही नवीन प्रकाशने


♧ पूर्व गोलार्धातील भूकेंद्र : भारत

मेजर जनरल य. श्री. परांजपे

♧ जेट युगातला मराठी माणूस

शंतनुराव किर्लोस्कर

♧ नक्षलबाडी : लाल सलाम

राजाभाऊ कुलकर्णी

♧ प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड १ ला - पूर्वार्ध व उत्तरार्ध

अ. ना. देशपांडे

♧ आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग २ रा : १९२४ – १९५०

अ. ना. देशपांडे

♧ माझ्या साहित्यसेवेतील स्मृती
(भाग ३ रा) ना. सी. फडके



व्ही न स प्र का श न

'तपश्चर्या'

३८१ क, शनिवार पेठ : पुणे ३०